# माणूस

५ जुलै ६९

चाळीस पैसे

आणि क्रॉस उचलीत असतानाची ख्रिस्ताची
वेदना एक शतांशाने जाणवत त्यांच्या मागोमाग
त्यांच्या एअरकंडिशण्ड ऑफिसात शिरतो.

— कलकत्ता दिनांक



५ जुलै १९६९

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष नववे : अंक : पाचवा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे २ : दूरध्वनी : ५७३५९

किंमत : ४० पैसे वार्षिक वर्गणी : वीस रुपये परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

शुक्रवार शनिवार आल्याबरोबर मी 'माणूस' करिता बुकस्टॉलकडे वळतो. 'माणूस' मधील काही सदरे फार आवडतात. 'ग्यानबाची मुक्ता-फळे' एकदम छान! उपहासात्मक व मनाची पकड घेणारी. अनेक लोकांच्या भावना व्यक्त करणारी. जातीयवादावर केलेले भाष्य शंभर टक्के खरे. रयत शिक्षण संस्थेच्या चालकांना प्राचार्य नेमताना भोसले, जाधव, शिंदे हवा आणि सदाशिव-पेठी कॉलेजांना दामले, जोशी हवा. आमच्या मराठवाड्यातही आता कॉलेजांचे उदंड पीक आलंय आणि त्यातील राजकारण व जातीयवादही असाच चालतो. मु. ल. सोमण ह्यांचे 'मुंबई समाचार' हे सदर बरे वाटते. ब्रिगेडियर दळवी ह्यांची 'झुंड' मनाची पकड घेते. पण दळवींच्या कथनात 'मी' पणा जास्त वाटतो. दत्तप्रसाद दाभोळकरांची 'विज्ञानेश्वरी' एकदम Top.

२२ जून ६९ — नरेंद्र गंगाखेडकर, मुंबई

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# मुंबई समाचार



सु. ल. सोमण

## राष्ट्रपती-राजवटीच्या दिशेने वाटचाल

काँग्रेसपासून अनेक वेळा घटस्फोट घेऊन पुन्हा काँग्रेस प्रवेश केलेल्या, सत्तरी ओलांडलेल्या श्री. हरिहरसिंगांच्या नेतृत्वाखालील बिहार मंत्रिमंडळ परवा कोलमडलं. मध्यावधी निवडणुकानंतरच बिहार सरकारच्या वाटचालीची दिशा बरीचशी निश्चितपणे अनेकांनी वर्तवली होती. कुठल्याही पक्षाला बहुमत नसल्याने तिथे स्थिर सरकार प्रस्थापित होण्याची शक्यता नव्हतीच. सुरुवातीपासूनच हे रंग दिसू लागले होते. बऱ्याच वाटाघाटीनंतर श्री. हरिहरसिंगांच्या नेतृत्वाखाली, काँग्रेस-प्रणीत संयुक्त मंत्रिमंडळ अस्तित्वात आले. छोटचा छोटचा प्रांतिक पक्षांना त्यामुळे मंत्रिमंडळात स्थान मिळाले. रामगढच्या कामाख्य नारायणसिंगांच्या मंत्रिमंडळातील प्रवेशामुळे पुन्हा एकदा बिहार-संबंधाने देशभर गोंधळ उडाला. शेवटी कामाख्य नारायणसिंगांचा मुलगा व पत्नी ह्यांना मंत्रिमंडळात प्रवेश द्यायला लावून सिंगांनी स्वतः राजिनामा दिला व हरिहरसिंग मंत्रिमंडळ तात्पुरते वाचवले. मंत्रिमंडळ तरीही धड काम करीत नव्हतेच. सर्वच गटांना खूश करण्यासाठी मंत्रि-मंडळाची संख्या चाळीसावर फुगवली गेली. तरीही धुसफूस चालूच होती. प्रत्येक मंत्र्याला भरपूर मलिदा मिळू शकेल असेच खाते चालू होते. अर्थात खातेवाटपा-संबंधी प्रश्न होताच. तेवीस मंत्री कुठल्याही खात्याशिवाय मंत्रिमंडळात होते. शेवटी शोषित दल, लोकतांत्रिक काँग्रेस, हुलझारखंड वगैरे पक्षांच्या सदस्यांनी, बिनखात्याच्या मंत्र्यांनी काँग्रेसनेतृत्वाखालील सरकारबरोबरचे संबंध तोडून टाकले. पशुसंवर्धन व संरक्षण खात्यांच्या मागण्यांच्या चर्चेवरील एका मतदानात विरोधी पक्षियांच्या बाजूनी मते दिली आणि हरिहरसिंगांची १४० दिवसांची

कारकीर्द संपुष्टात आली. ह्या १४० दिवसात मंत्रिमंडळ टिकवण्याचेच प्रश्न एवढे गंभीर होते की, शासनसुधारणेबाबत ह्या हरहरसिंग-मंत्रिमंडळाने काही कार्य केले का? हा प्रश्नच विचारणे हास्यास्पद आहे.

हरिहरसिंगांच्या पाडावानंतर बिहारचे भूतपूर्व मुख्य मंत्री श्री. भोला पास्वान शास्त्री यांनी पुन्हा एकदा मुख्य मंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारली आहे. सगळ्या छोट्या छोट्या (एकूण ६) पक्षांचा त्यांना पाठिंबा असून त्याच पक्षांतील आमदारांतून मंत्रिमंडळ बनविले जाणार आहे. शास्त्री मंत्रिमंडळाला अर्थातच चार प्रमुख विरोधी पक्षांचा – जनसंघ, उ. कम्युनिस्ट, संसोपा व प्रसोपा ह्यांचा भरघोस पाठिंबा राहणार आहे. मात्र हे पक्ष प्रत्यक्ष मंत्रिमंडळात सहभागी होणार नाहीत. म्हणजेच घोष सरकार बंगालात किंवा गिल-सरकार पंजाबात बसवताना जो डाव काँग्रेसने टाकला तोच डाव हे पक्ष आता खेळणार आहेत. ह्या चार बड्या विरोधी पक्षांच्या साहाय्याने अल्पमतातले सरकार बिहारात शासनाचा गाडा चालवणार आहेत. आणि ह्या चार पक्षांचेही आपसात किती जमते हे साऱ्या जगाला माहीत आहे. शिवाय शास्त्री मंत्रिमंडळातले सगळेच, 'आयाराम-गयाराम' पद्धतीतून मंत्रिपदावर चढलेले! त्यांना जो कुणी अधिक 'दामाजी' देऊ करील तिकडे ते वळणार. म्हणूनच गांधीवादी-हरिजन पण काशी विद्यापिठाची 'शास्त्री' पदवी मिळविणाऱ्या श्री. भोला पास्वान यांचे हे मंत्रिमंडळ कितपत टिकेल याची शंका वाटते. बिहार फार झपाट्याने राष्ट्रपती राजवटीच्या दिशेने वाटचाल करीत आहे हेच खरे.

## अध्यक्ष पॉम्पिदूचा विजय

फ्रान्सचे अलीकडच्या काळातले विधाते जनरल द गॉल ह्यांना फ्रान्सच्या जनतेने बरोबर दोन महिन्यांपूर्वी नकार दिला आणि जनरलनी अधिकारसूत्रे खाली ठेवली. गेल्या एप्रिल-मे मधली यादवीयुद्धाची आठवण करून देणारी अराजकं, 'फ्रँक'चे अवमूल्यन वगैरे अनेक प्रश्नांनी फ्रान्स ग्रासलेला होता. कम्युनिस्टांचा व त्यांच्या अधिपत्याखालील चळवळींचा उद्रेक रोजच्या रोज वाढत होता. ह्या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी फ्रेंच नॅशनल असेंब्लीच्या निवडणुका गतवर्षी ज. द गॉल ह्यांनी घेतल्या. त्यांत गॉलिस्टांना प्रचंड विजय मिळाला. आणि त्यानंतर काही महिन्यांनी, पूर्वीच घोषित केल्याप्रमाणे द गॉलनी स्वत:संबंधीचा कौल लावला. त्यात ते पराभूत झाले. ह्या परिस्थितीत देशात काय घडणार हाच प्रश्न अनेक फ्रेंच विचारवंतांच्या मनात उभा होता. १९५८ पूर्वीच्या चौथ्या फ्रेंच रिपब्लिकच्या कारकीर्दीतला काळ फ्रान्सला अत्यंत अस्थिरतेचा गेला. रोज मंत्रिमंडळे कोसळत होती,

शासन खिळखिळे झाले होते. १९५८ मध्ये अध्यक्ष द गॉल ह्यांनी सत्तासूत्रे हाती घेतल्यानंतर, गेली बारा वर्षे फ्रान्समध्ये राजकीय स्थिरता निर्माण झाली. त्याचबरोबर जनरल द गॉल फ्रान्सची नवीन राष्ट्रीय अस्मिता फ्रेंच जनतेला देण्यात यशस्वी झाले. स्वतंत्र परराष्ट्र धोरण स्वीकारून इंग्लंड-अमेरिकेचे वर्चस्व फ्रान्सनी झुगारून दिले. जर्मनाबरोबर मैत्री संपादन करून 'पॅरिस-बॉन'ची जबरदस्त फळी त्यांनी युरोपात उभी केली; तर चीन, रशिया आदी कम्युनिस्ट राष्ट्रांबरोबर नवे संबंध त्यांनी प्रस्थापित केले. फ्रान्सची ही आंतरराष्ट्रीय प्रतिमा तयार करीत असताना अंतर्गत परिस्थितीवर ताबा ठेवणे मात्र त्यांना जमले नाही. वाढती महागाई, बेकारी, दुर्लक्षित शैक्षणिक व्यवस्था, भावी जीवनातली अनिश्चितता, ढासळता आर्थिक डोलारा ह्यांमुळे अंतर्गत परिस्थिती बिघडत गेली. विद्यार्थ्यांच्या उठावामुळे ह्या अंतर्गत तणावाला तोंड फुटले. कामगारांनी हे आंदोलन पुढे रेटले. तात्पुरते उपाय योजून द गॉल राजवटीने जरी मार्ग काढायचा प्रयत्न केला, तरी तिला त्यात संपूर्ण यश मिळाले नाही आणि त्यातच शेवटी जनरल द गॅलना सत्ता सोडावी लागली.

बरोबर दोन महिन्यांनी गॉलिस्ट पक्षाचेच पॉम्पिदू ह्यांची फ्रेंच जनतेने अध्यक्षपदासाठी निवड केली आहे. ज्या मे अराजकांनी अध्यक्ष द गॉल ह्यांचा बळी घेतला, त्या अराजकांच्या वेळची

मातांनो
आपले बाळ
निरोगी असावे
असे आपल्याला
वाटते ना ?
बाळाच्या
कोणत्याही तक्रारींवर
खालील ठिकाणी
वैद्यकीय सल्ला
मिळेल.

न्यू इरा
होमिओपॅथिक
फार्मसी

दादर रेल्वे स्टेशनसमोर,
(पश्चिम) मुंबई-२८

परिस्थिती आजही फ्रान्समध्ये आहेच. बेकारी, वाढती महागाई, घसरता फ्रँक, औद्योगिक शैक्षणिक अस्थिरता सारे काही आजही कायम आहेच. शिवाय जनरलना, त्यांच्या सुरुवातीच्या काळात जी अफाट लोकप्रियता मिळाली ती अध्यक्ष पॉम्पिदु यांच्या पाठीशी नाही. थोडक्यात अध्यक्ष पॉम्पिदूंना अत्यंत खडतर परिस्थितीतून मार्ग काढावा लागणार आहे. पॉम्पिदु हे द-गॉल राजवटीत पंतप्रधान होते. मे-बंडाळयांच्या वेळी ज्या तडफेने त्यांनी वेगवेगळ्या प्रश्नांवर निर्णय घेतले त्यामुळे त्यांच्याविषयीही बऱ्याच अपेक्षा फ्रेंच जनतेच्या मनात निर्माण झाल्या असल्यास नवल नाही. तरीही त्यांना फार मोठ्या अंतर्गत अडचणींवर मात करावी लागणार आहे. त्यात ते यशस्वी झाले तरच ते जनरल द गॉल प्रमाणे, स्थिर राजवट फ्रान्सला देऊ शकतील अन्यथा ते त्यांची सात वर्षांची कारकीर्दही पूर्ण करू शकणार नाहीत.

पॉम्पिदूंची निवड ही काहीशी आश्चर्यजनक होती. एकतर दोनच महिन्यांपूर्वी गॉलिस्ट तत्त्वज्ञानाचे प्रणेते जनरल गॉलना फ्रेंच जनतेनी सत्तात्याग करायला भाग पाडले होते. फ्रान्सचे तात्पुरते अध्यक्ष पोहेर यांना फार मोठा पाठिंबा ह्या निवडणुकीच्या वेळी व्यक्तविला गेला होता. पॉम्पिदुची पंतप्रधान ह्या नावानं झालेली कारकीर्द फारशी लोकप्रिय झालेली नव्हती. तथापि फ्रेंच नॅशनल असें-ब्लीत गॉलिस्टांचे बहुमत असल्याने पोहेर किंवा इतर कुणाचीही निवडणूक म्हणजे असेंब्लीच्या पुन्हा निवडणुका घ्याव्या लागल्या असत्या. फ्रेंच जनतेला त्या परवडल्या




नसत्या. शिवाय द-गॉलना नाकारले असते तरी त्यांना फ्रान्समध्ये अफाट लोकप्रियता होती हे नाकारून चालणार नाही. अर्थातच गॉलिस्ट तत्त्वज्ञानच पुढे चालवण्याच्या आश्वासनाचादेखील मतदारांवर परिणाम झाला असला पाहिजे. कम्युनिस्टांनी निवडणुकीवर बहिष्कार टाकल्याने व डाव्यांनी पोहेर ह्यांना पाठिंबा न देता स्वतंत्र उमेदवार उभा केल्यामुळेही अध्यक्ष पॉम्पिदू ह्याना फायदा मिळाला. प्रत्यक्षात मागच्या अध्यक्षीय निवडणुकीत जनरल द गॉलना मिळालेल्या मतांपेक्षा (४९%) थोडीशी जास्तच मते अध्यक्ष पॉम्पिदूंना मिळाली आहेत. (५१%) अर्थातच, जनतेच्या ह्या पाठिंब्यामुळे त्यांची बाजू जास्त बळकट झाली आहे.

अध्यक्ष पॉम्पिदूंनी जनरल द गॉल यांच्या परराष्ट्रीय धोरणात तूर्त तरी काहीही फेरबदल न करण्याचेच ठरवले आहे. म्हणजेच युरोपियन कॉमन मार्केटमध्ये ब्रिटनला प्रवेश देण्याबाबत काही क्रांतिकारक धोरण स्वीकारले जाण्याची शक्यता संपलेली आहे. गॉल गेले, पण ब्रिटनला दरवाजे मात्र अद्यापही बंदच राहणार आहेत. तद्वतच यूरोप–पूर्व व पश्चिम, प. आशियाई संघर्ष वगैरे बाबतही फरान्सची धोरणे तूर्त तरी आहेत तीच राहतील.

## मॉस्को परिषद

रशिया व चीन ह्यांच्यांत संघर्ष सुरू झाल्यापासूनच जागतिक कम्युनिस्ट चळवळ रशियाच्या वर्चस्वाखाली आहे हे सिद्ध करून चीनला शह द्यायचा प्रयत्न रशियन नेते करीत होते. रशियाचे माजी सर्वसत्ताधीश श्री. क्रुश्चेव्ह ह्यांच्या काळातच १९६२ साली जागतिक कम्युनिस्ट परिषदेचं सूतोवाच केलं गेलं होतं. परंतु त्या वर्षी परिषद होऊ शकली नाही. त्यानंतर अनेक वेळा प्रयत्न होऊनही ही परिषद लांबणीवरच पडली. शेवटी परवा, श्री. ब्रेझनेव्ह ह्यांच्या प्रयत्नांना यश आलं, आणि ७५ राष्ट्रांची शिखर परिषद मॉस्कोत भरली. ही परिषद भरली आणि ७५ राष्ट्रांच्या सह्यांनी एक मसुदा संमत करण्यात आला. मॉस्कोहून परतल्यानंतर श्री. श्री. अ. डांग्यांनी दिलेल्या मुलाखतीनुसार परिषदेचं हे यश म्हणता येईल. परंतु ज्या उद्दिष्टांनी रशियन मुत्सद्यांनी ह्या परिषदेचा घाट घातला ती उद्दिष्टे पूर्ण करून घेण्यात रशियाला यश मिळालं नाही हे मात्र निश्चित. ब्रेझनेव्ह ह्यांच्या परिषदेतल्या भाषणावर व संमत करण्यात आलेल्या अंतिम मसुद्यातल्या तपशीलांवर नजर टाकली तरी हे लक्षात येऊ शकेल. चीनचा धिक्कार करून त्याला कम्युनिस्ट जगतांतून वाळीत टाकण्याचा जो डाव रशियनांनी रचला होता व वॉर्सा राष्ट्रे, भारत, पाक आदी राष्ट्रांचे नेते ह्यांनी तो संमत करून घेण्याच्या

[पृष्ठ–५३ वर]



# मुक्ताफळे

## थोर सोसायटीचा अध्यक्ष

आपल्या देशात निधर्मीपणा रुजावा यासाठी काही मंडळी सतत प्रयत्न करीत असतात. यातले एक थोर गृहस्थ म्हणजे प्रा. अ. भि. शहा. ‘ इंडियन सेक्युलर सोसायटी ’ या नावाची एक महान संस्था यासाठी राबत असते व तिचे प्रा. शहा अध्यक्ष आहेत. संस्थेचे मुख्य कार्य म्हणजे जिथेजिथे काही धर्मविषयक हालचाली होत असतील त्यांविरुद्ध वृत्तपत्रांतून पत्रे लिहिणे हे आहे असे दिसते.

गुजराथ राज्यात गोध्रा नावाचे शहर आहे. या शहरात एका वैष्णव मंदिराचे बांधकाम सुरू झाले आहे. हे मंदिर ज्या रस्त्यावर बांधले जात आहे तो रस्ता प्रामुख्याने मुसलमान वस्तीतून जातो. किंवा हिंदुस्थानातील या रस्त्याच्या आसपास फाळणी झाल्यानंतरही बरेच मुसलमान राहत आहेत असे म्हणूया. काही बिघडले नाही. “ या भागांत गेल्या १०० वर्षात एकही हिंदू देवालय नसतांना या मंदिरामुळे शहराच्या या भागात हिंदू मुसलमान कायमची तेढ निर्माण होण्याची शक्यता आहे. ” अशी तक्रार करणारे पत्र अ. भि. शहांनी तावडतोब मुंबईच्या टाईम्स पत्रात लिहून टाकले. समजा अनेक वर्षांनी एखाद्या लग्न झालेल्या बाईला मूल झाले तर गेल्या कित्येक वर्षात मूल नसताना आताच कसे झाले अशी शंका आसपासच्या लोकांना येणे सहाजिकच नाही काय ? शंभर वर्षे विचारात घेतली तर त्यातील ७५ वर्षे हा देश पारतंत्र्यात होता. नवे मंदिर सोडा, असलेले मंदिर टिकणे कठीण होते. असे काही मनात येणे यासाठी लागणारे लेचेपेचे धार्मिक मन श्री. शहा यांचे नाही. परंतु त्यांचा संताप झाला आहे तो केवळ यामुळे नाही. ते पुढे लिहितात.

“ गोध्राच्या टाऊन प्लॅनिंग स्कीमप्रमाणे पुढे जो मोठा रस्ता होणार आहे, त्या रस्त्याच्या २/३ क्षेत्रफळावर हे मंदिर बांधले जात आहे. गोध्राच्या म्युनिसिपालीटीने या मंदिराला काही जमीनही दिल्याचे कळते. सरकारी अनुदान घेणाऱ्या

नगरपालिकेसारख्या संस्थांनी एका विवक्षित धर्माच्या प्रसाराकरिता अशा तऱ्हेने जमीन देणे हे घटनाविरोधी कृत्य होय."

गोध्राच्या म्युनिसिपालिटीचे सभासद पुण्या-मुंबईला फिरणारे असावेत. मुंबईला मेट्रो सिनेमाजवळची रस्त्याच्या मध्यभागी आडमाप पसरलेली मशीद किंवा पुण्याला स्वारगेटपाशी रस्त्याच्या मध्यभागी फडकणारी हिरवी निशाणे पाहून त्यांना वाटले असेल की मुंबई-पुण्याच्या म्युनिसिपालट्या जर आज असलेल्या रस्त्याच्या मध्य-भागी मशिदी राहू देतात तर पुढे कदाचित होणाऱ्या रस्त्याच्या मध्यभागी देऊळ बांधू द्यायला काय हरकत आहे? हे साफ चूक आहे. गोध्राच्या मुसलमानांना तिथे मशिद बांधूं दिली असती तर प्रश्न नव्हता. परंतु गेल्या १०० वर्षांत देऊळ नसताना देऊळ बांधू देणे याला काय वो अर्थ आहे!

प्रा. शहा यांनी बारीक लक्ष ठेवून या भयंकर प्रकाराला तोंड फोडले हे चांगले केले. परंतु श्री. शहा यांनी एक गफलत केली आहे. जिथे देऊळ होते आहे तिथे आसपास हिंदू असलेच पाहिजेत. शिवाय तेढ निर्माण होईल असे प्रा. शहा म्हणतात त्यावरूनही गोध्राच्या या भागाचा अगदीच 'मल्लापुरम' झालेला नाही असे दिसते. १९४८ साली गोध्रा येथे मोठी जातीय दंगल झाली त्याचाही उल्लेख प्रा. शहांनी पत्रात केला आहे. ही दंगल कुणी केली? कशी सुरू झाली? याची साद्यंत हकीगत प्रा. शहांनी प्रसिद्ध केल्यास ते त्यांना व इतरांना फारच हितकारक होईल.

कुणा जे. सी. गांधी नावाच्या धार्मिक गृहस्थाने प्रा. शहांना अडवणारे पत्र टाईम्सला लिहिले. त्यात श्री. गांधी लिहितात- "एखाद्या विभागात विशिष्ट जात बहुसंख्य आहे, म्हणून तिथे इतर धर्माचे प्रार्थनास्थळ बांधायचे नाही, हे म्हणणे बरोबर नाही." आम्ही म्हणतो, प्रा. शहांच्या म्हणण्याप्रमाणेच केले तर? उद्या भारतात हिंदू बहुसंख्य असलेल्या सर्व शहरांतून मशिदी हलवाव्यात असे कुणी म्हणेल! बापरे...प्रा. अ. भि. शहांना हे मुळीच मान्य होणार नाही. मुसलमान वस्तीतल्या देवळांचे काय करावे; बांधावी की नाही, कशी बांधावी, कुणी बांधावी, यासंबंधी त्यांची सोसायटी विचार करील. कारण, त्यांच्या सोसायटीचे बहुसंख्य सभासद हे निधर्मी हिंदू असावेत. शहांनी गांधींकडे लक्ष देऊ नये.

या निधर्मी महापुरुषाला, एक-दोन महिन्यांतच महाराष्ट्र सरकारची आणखी एक घटनाविरोधी गोष्ट आढळून आली. महाराष्ट्र सरकारने वेदांच्या अभ्यासासाठी व पाठांतर पद्धतीने वेदविद्या जतन करण्यासाठी, चार गुरुजी व आठ विद्यार्थी यांना मासिक अनुदाने देण्याचे ठरवले. १२ जून ६९ ला वृत्तपत्रात लिहिलेल्या पत्रात प्रा. अ. भि. शहा विचारतात-

"एका विशिष्ट धर्माला सार्वजनिक पैशांतून आर्थिक प्रोत्साहन देणे हे स्वतःला निधर्मी म्हणवणाऱ्या राज्यसरकारला शोभते काय? जर वेदविद्येच्या अभ्यासाला प्रोत्साहन द्यायचेच होते तर त्याचबरोबर बायबल, कुराण, अवेस्ता, धम्मपद या

इतर धर्मांच्या धार्मिक अभ्यासाला सरकार का प्रोत्साहन देत नाही ?"

आम्हांला नक्की माहीत नाही. परंतु महाराष्ट्र सरकारचे यावर म्हणणे असे असावे—

'देशात खाणारी तोंडे फार झाल्यामुळे आम्ही प्रत्येक माणसाने एकच बायको करावी व कुटुंबनियोजन करावे अशी अपेक्षा करतो. शक्यतो मुलेच नकोत, झाल्यास एकच पुरे, असा जोरदार प्रचार चालवला आहे. यासाठी एक पत्नीत्वाचा कायदाही केला आहे. धर्माच्या नावावर जे धर्म बहुपत्नीत्व किंवा बहुप्रसवाचा पुरस्कार करतात, त्यांना यामुळे आर्थिक प्रोत्साहन देणे सरकारला अशक्य आहे !'

– शहासाहेब मोठी पंचाईत आहे ! तुम्ही तेवढी ती सर्वांसाठी एकच 'सिव्हिल कोड' करण्याची चळवळ जोरात करा बुवा ! तोपर्यंत काय देवळे बांधून होतील, वे. शा. संपन्नता येईल ती येऊ द्या—तेवढे सिव्हिल कोडचे बघा !

हिंदू-मुसलमान जातीय प्रश्नासंबंधीदेखील तुमचे गणित थोडे अधिक डोळस ठेवा. इंडियन एक्स्प्रेसमध्ये गेल्या आठवड्यात लिहिलेल्या पत्रात तुम्ही लिहिता— "भारताच्या गृहखात्याने २३ जातीय दंग्यांची पाहणी केली. त्यांतील २२ दंगली या मुसलमानांनी सुरू केल्याचे आढळले."

ज्या अर्थी तुमच्यासारखा निधर्मी माणूस हे कबूल करतो त्या अर्थी हे खरे असावे ! अशा परिस्थितीत जिथे एकदा दंगल झाली तिथे पुन्हा दंगल होणार नाही अशी कायम व्यवस्था करण्याकडे हिंदूंची प्रवृत्ती वाढत आहे, हा शहाणपणा नाही काय ?

---

## चातुर्ये शृंगारावे शरीर !

---

चद्दर म्हणजे चादर ! जाड—पांघरायची. यावरूनच खद्दर म्हणजे खादी हा शब्द निर्माण झाला असावा. चद्दर प्रमाणेच खद्दर देखील जाड पांघरायची असते. 'प्रासाद' देखील, देश पारतंत्र्यांत असताना ज्यांना 'बंदिशाळा' वाटे, त्यांनी शरीर पांघरण्याकरिता जी वस्त्रे वापरायची ती प्रासादस्थानाप्रमाणे सुळसुळीत व झुळझुळीत असून चालले असते काय ? पारतंत्र्याप्रमाणे सतत बोचणारे हवे म्हणून हे बोचरे वस्त्र—खादी निर्माण झाली. देशभक्तांनी ती हौसेने अंगावर मिरवली. खादीचे पंचे, खादीची धोतरे, खादीच्या साड्या, खादीच्या पिशव्या, खादीच्या टोप्या असे सगळे त्या वेळी असायचे. खादी वापरणाऱ्या माणसांकडे लोक आदराने पाहत. यावरून असा गैरसमज पसरला की खादीमुळे आदर वाढतो !

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हा गैरसमज झपाट्याने वाढला. डँबीस, चोर, पाजी, स्त्रियांवर वाईट नजर ठेवणारे, गावगुंड, हातभट्टीवाले या सर्वांनी खादीचा 'गणवेष'च करून टाकला. ही कवचकुंडले अंगावर घातली की मामलतदार

कचेरीपासून सचिवालयापर्यंत दादागिरी करता येते असा अनुभव येताच काय विचारता ! खादीच्या प्रेमात सर्वच पडले.

'यंत्रयुग आणि खादी' यासंबंधी लिहिताना विनोबांनी एक गोष्ट सांगितली आहे. सुंद व उपसुंद नावाचे दोन बलाढ्य राक्षस होते. दोघे सख्खे भाऊ. देवांना मग भीती वाटली. त्यांनी तिलोत्तमा नावाची बाई निर्माण केली. तिला पाहून दोघे राक्षस भुलले. यावरून ती सुंदर असावी ! दोघजण 'ही माझी' म्हणू लागले. बाई पडली एक व हे दोघे. दोघांनी गदा उचलल्या. बाई पाहतच राहिली. हे दृश्य पाहायला गणपती हजर होते. गणनायकाला नेहमी हे प्रकार पाहावे लागतात.

सुंदोपसुंद भांडत असताना गणपती आपला सोंडेकडे पाहत होता. डोळा वर करून त्याने तिलोत्तमेकडे पाहिलेसुद्धा नाही. कारण ज्या अर्थी एका बाईकरिता दोघे भांडत होते, त्या अर्थी बाईच वाईट चालीची असावी असा आपला नेहमी-प्रमाणे सर्व कुरूप मंडळींचा तर्क !

आम्हांला वाटते खादीकरिता काँग्रेसी मंत्री व गावगुंड हो दोनच प्रमुख गिऱ्हाइके सध्या आहेत. या सुंदोपसुंदांच्या झगड्यात ही 'तिलोत्तमा' सापडली आहे. जगात युद्ध चालू होते तेव्हा विनोबांनी ही कथा सांगितली, ती अशाकरिता की, जगात सुंदोपसुंद भांडत आहेत. बाहेरचा पक्का माल आता येणार नाही. तेव्हा चला आपण खादी कातू या ! थोडक्यात गणपतीने तिलोत्तमा पळवण्याचा विचार ताबडतोब करावा असा विनोबांचा भावार्थ होता.

आम्हांला या कथेची आठवण झाली ती अशाकरिता की वाईट चालीच्या बाईला पळविण्याचा उपदेश आम्हांला चुकीचा वाटतो. ही खादी...अंगवस्त्र करण्याच्याच लायकीची नाही, हा विचार कुणाच्याच मनात आतापर्यंत का आला


# Radio Electric Institute

Lamington Chambers, opp. : Naaz-Bombay-4.

OFFER INTENSIVE TRAINING IN THEORY & PRACTICALS

(1) Air-conditioning/Refrigeration : (Full/Part-time)
(2) Radio Transistor Servicing : (Full/Part-time)
(3) TELEVISION (Weekly)
(4) Mechanical Draughtsman,
(5) Wireman Apprentice, Electricians etc. courses, for S. S. C. and more advanced students.

Classes commenced. Admission closes shortly.

Enrol Immediately. Supdt. of Instructions

नाही या चिंतेत आम्ही होतो.

परंतु हिमाचल प्रदेश काँग्रेस कमिटीने नुकतीच एका ठरावाने अशी मागणी केली आहे की काँग्रेसच्या क्रियाशील सभासदांनी अंगावर खादी घातली पाहिजे ही जाचक अट तावडतोब रद्द करावी. इतिहासजमा झालेली ही जाडी–भरडी खादी घालण्याची अट तरुण रक्त व काँग्रेस संघटना यांच्या आड येत आहे.

आता क्रियाशील सभासद खादी घालतात हा एक गोड गैरसमज आहे. अंगावर खादी घालून इकडेतिकडे फिरणारे काँग्रेसी मंत्रिजन पाहिले की हे काही ' क्रिया ' करीत असतील हे कुणीही मान्य करणार नाही. त्यांच्याकडे पाहिले की वाटते मानापमानांतील लक्ष्मीधराप्रमाणे खाणे, लोळणे आणि दौरे करणे, या क्रिया करताना––"परमेश्वराने ही हाडे थोडी मऊ केली असती तर काय बहार आली असती " एवढा एकच हृद्रोग आता यांना असावा ! १९७२ साली आता फक्त यांची अखेरची क्रिया शिल्लक आहे. अर्थात ती इतरांनी करायची क्रिया आहे. खादी न घालता ती करता येईल.

असो. तरुण काँग्रेसमध्ये येत नाहीत कारण ही खादीची अट, हा हिमाचल काँग्रेसचा तर्क मात्र बरोबरच आहे. खादीचे अभिमानी सांगतील––" अहो काय हे बोलणे ? महात्माजी या खादीला स्वातंत्र्याचा गणवेष Livery of freedom म्हणत असत. आता खादी इतकी तलम, आकर्षक रंगाची व सुंदर पोताची निघते, की खादी लवकर मळते, अंगाला बोचते, खरखरीत असते हे कसलेच आरोप टिकणारे नाहीत.

हे काय चालले आहे तेच आम्हाला कळत नाही ! आम्ही उपास करतो त्या दिवशी, साबुदाण्याची खिचडी आणि लापशी पितो. निरसनाचेच खाईन असे व्रत असते म्हणून आम्ही हे करतो. महाशिवरात्रीला किंवा आषाढी एकादशीला ऊपास करणे यात थोडी प्रतिष्ठा असते म्हणून कदाचित आम्ही हे करीत असू. परंतू म्हणून श्रीखंडापेक्षा लापशी चवीला चांगली आणि खिम्यापेक्षा खिचडी ही अधिक ओजस्वी असा आग्रह धरण्यात काय वो अर्थ आहे ?

स्वातंत्र्य मिळाले; खादीचे व्रत संपले. प्रतिष्ठा संपली. वैभव संपले. स्वातंत्र्यपूर्व काळात ज्याच्याकडे अन्यथा तरुण मुली ढुंकून पाहणे शक्य नाही किंवा जिच्याकडे चुकून पाहिले तर तोंड फिरवावे असे तरुणांना वाटे अशा ' सुमार ' मुली––निदान खादी घालून तरी काही जमते का पाहत असत ! याचे कारण खादी आकर्षक नव्हती तर खादीचे असे काही एक वेगळे सौंदर्य महात्माजींनी निर्माण केले होते. आता अशा तरुण मंडळींनी खादी घातली तर कुरूपतेचा फक्त गुणाकार व्हायचा !

बरे ' सुंदर ' देह लाभलेल्यांनाही खादी वापरण्याचे आता कारण काय ? जास्तीत जास्त अंग उघडे टाकायला खादी ही तद्दन निरुपयोगी आहे. यासाठी सुळसुळीत पारदर्शक वस्त्रे घालावी लागतात. म्हणजे उघडे ते दिसतेच आणि झाकले

गेले आहेसे वाटते तेही अधिक लोभसवाणे वाटते. तेव्हा मुद्दा जर तरुणांना कॉंग्रेस-मध्ये कसे आकर्षित करावे हा असेल तर हिमाचल प्रदेशाची विनंती अ. भा. कॉंग्रेसने ताबडतोब मान्य करणे आवश्यक आहे असे आम्हांस वाटते.

तेव्हा वस्त्रे शृंगारे शरीर। हे खरे असेल तर सुंदर तरुण-तरुणींना अथवा कुरूप तरुण तरुणींनाही खादी वापरण्याचे तूर्त काही कारण दिसत नाही. परंतु कॉंग्रेसी मंत्री, उपमंत्री, आमदार, गावगुंड, हातभट्टीवाले, यूनीयनला लुबाडणारे पुढारी यांनी खादी सोडू नये. कारण यांच्या अंतरी नानाकळा असतात. उपजत चातुर्याशिवाय अशा कळा शक्य नाही. धंदा म्हणून यांनी खादी वापरणे चतुराईचे आहे. चातुर्ये शृंगारावे शरीर ' ही गोष्ट लंगोटी घालून फिरणाऱ्या रामदासांना अगम्य असावी. नाहीतर–

आपण यथेष्ट जेवणे। उरले तरी वाटणे।
काही वाया दवडणे। हा धोरणी नव्हे।।

असा उपदेश करणारा हा धोरणी ब्राह्मण ही साधी गोष्ट सांगायला विसरला असता काय ?

---

## राष्ट्रीय धंद्यांना प्रतिबंध का ?

---

या पृथ्वितलावर अल्जीरिया नावाचा एक छोटासा देश आहे. या देशाचे राष्ट्राध्यक्ष बोमेदिन यांनी नुकताच एक वटहुकूम देशात जारी केला. या हुकुमान्वये मुलांनी बूट पॉलिश करणे व कुणीही भीक मागणे या दोन्ही गोष्टींना देशात मज्जाव करण्यात आलेला आहे. चार वर्षे सक्तमजुरीची शिक्षा या आज्ञेचा भंग करणाऱ्यांना दिली जाणार आहे. अल्जिरियाचे भवितव्य आम्हांला ठीक दिसत नाही. बूट पॉलीश करणे व भीक मागणे हे फार हलके धंदे आहेत असे अध्यक्ष बोमेदिन यांना वाटते का काय ? अल्जेरियापेक्षा क्षेत्रफळांनी आडमाप आणि लोकसंख्येने बारेमाप असलेले देश, केवळ हे दोन राष्ट्रीय उद्योग करून दिवस काढू शकतात हे बोमेदिन यांना माहीत नाही ? भीक कुणाकडेही मागावी, मिळेल तेथून घ्यावी; बूट पॉलीश करायचे बूट मात्र थोरामोठ्यांच्या पायावरचे असावे म्हणजे झाले. समजा उद्या या देशाचा अध्यक्ष नवीन पिढीपैकी कुणी झाला, देशांत फारसे काही पिकत नाही, पिकते ते नीट वाटता येत नाही, घरमेद्यांनी देशात बंडाळी माजवलेली असा प्रसंग आल्जेरियावर आला तर त्या वेळच्या अध्यक्षाला त्या वेळच्या अमेरिकेच्या अध्यक्षाचे व रशियाच्या पंतप्रधानाचे बूट साफ करताना लाज वाटेल ! तो ते करणार नाही. जगात तो भीक मागत फिरायलाही नकार देईल. अशा वेळी देशाचे काय होईल...हा विचार श्री. बोमेदिन यांनी करावा...आणि पुढच्या पिढ्यांना अनासायासे मिळणारी ही सांस्कृतिक धंदेशिक्षणाची सोय त्यांनी नाहीशी करू नये !

**–ग्यानबा**




## सरिता

२

**चंद्रशेखर**

सकाळचे नऊ वाजलेले आहेत. कलकत्त्याला येऊन दोन तास झालेले आहेत. रोजचे नित्यकर्म अटोपून मी निवासाच्या दारात एका बिझनेस एक्झिक्युटिव्हची वाट पाहतो आहे.

एक हिरवी स्टँडड सर्रकन येऊन उभी राहते.

आगरवालसाहेब खटकन दार उघडतात. घामाचे लोट पुसण्याचा प्रयत्न करीत मी त्यांच्या शेजारी बसतो. ते माझ्याकडे पाहून हसतात. त्यांच्या खास यूपीयन ढंगात ते बोलू लागतात. गाडी नेताजी सुभाष रोडवरच्या त्यांच्या ऑफिसच्या दिशेने धावू लागते.

सुस्तपणे उलगडत जाणारा रस्ता अकस्मात कोठेतरी संपतो. गाडी पार्क करून आगरवाल खाली उतरतात. त्यांच्या सर्वच वावरण्यात एक प्रकारचा मोजकेपणा आहे. त्यांच्या मागोमाग मीही रस्ता क्रॉस करू लागतो.

रस्त्याच्या पलीकडे जे दृश्य दिसते त्याने माझे पाय अर्ध्या रस्त्यात खिळतात. डोक्यात खिळे मारले जात आहेत असे वाटू लागते. आगरवाल रस्ता पार करून मागे पाहतात. त्यांच्या मुद्रेवरच्या तातडीने मी भानावर येतो आणि क्रॉस उच-लीत असतानाची ख्रिस्ताची वेदना एक शतांशाने जाणवत त्यांच्या मागोमाग त्यांच्या एअरकण्डिशण्ड ऑफिसात शिरतो. बेल खणखणते. कॉफीची ऑर्डर जाते. इंडिया किंगचे पाकीट पुढे टाकीत आगरवाल म्हणतात.

'फरमाइये.'

मी मनात म्हणतो 'शरमाइये'. उघड अर्थातच मैं बंगालकी पोलिटिकल स्टोरी कव्हर करने आया हूं—वगैरे वगैरे !

काही क्षणांपूर्वी नेताजी सुभाष रोडसारख्या गजबजलेल्या रस्त्यावर 'अनकव्हर' झालेली स्टोरी माझ्या साऱ्या अस्तित्वावर एक न पुसला जाणारा डाग उठवून गेली आहे हे मी आगरवालना सांगत नाही. सांगून काही उपयोग नाही; कारण त्यांना हे सारे रोजचे आहे. त्या दृश्याने त्यांची ना पावले थबकतात, ना काळीज थरकते. पापणीही न लवता ते त्या दृश्याला पार करून पुढे जाऊ शकतात—हॅपी यंग मॅन ?

बंगाली स्त्रीचे मला झालेले पहिले दर्शन हे विश्वदर्शन होते. फूटपाथच्या कडेला सकाळी नऊ वाजता एक मध्यम वयस्क स्त्री 'रिलिव्हिंग द् ब्लॅडर'साठी बसली होती ! आणि जवळची एकदोन पोरे अत्यंत खेळकरपणाने तिच्या रोखाने खडे मारीत होती ! हे नग्नत्व मला अजून अनेक वार पाहावयाचे होते. त्याच दिवशी दुपारी बिधनसरनी रोडवर हिंडत असताना रस्त्याच्या कडेला पडलेले शेकडो स्त्रीपुरुष मी पाहिले. त्यांतील बहुतेक अर्धवस्त्र वा विवस्त्र होते. कित्येक वेडे होते. त्यांच्या त्या नग्न भग्नतेने वातावरणावर विलक्षण सावट आणले होते. मला वाटू लागले मिळेल त्या फ्लाईटने कलकत्ता सोडावे आणि कोठेही जावे !

चौकशी करता मला कळले की, हे तात्पुरते निर्वासित आहेत. दुष्काळ—अकाल पडला की त्या जिल्ह्यातील लोक निर्वाहासाठी कलकत्त्यात येतात. असे रस्त्या-काठी पडून राहतात. त्यांच्यात बहुसंख्य स्त्रिया असतात. (असे का याचे कारण मात्र मला अज्ञातच राहिले !)

या दृश्याने घायाळ झालेले माझे मन नंतर थोडे निढावले— साकळले !

नंतर कलकत्त्याच्या अनेक रस्त्यांत बेबंद भटकताना बंगाली स्त्रियांच्या चर्येवर मला ही साकळलेपणाची भावना स्पष्ट दिसली. रस्त्यात, ट्राममध्ये, बसमध्ये, थिएटर-मध्ये, ऑफिसांमध्ये, कॉफी हाऊसमध्ये मी बंगाली स्त्री पाहिली. या सर्व निर-निराळ्या पार्श्वभूमीवरदेखील तिची चर्या निराळी दिसली नाही. दाताखाली दाबून धरलेला ओठ हे बंगाली स्त्रीचे प्रतीक म्हणावयास हरकत नाही.

" नाटककाराच्या शोधात सहा पात्रे " या नाटकात आईचा जो स्टान्स आहे तो आज बंगाली स्त्रीचा दिसतो. कोणी काही म्हटले, कितीही राजकीय हातचलाखी केली तरी बंगाली स्त्रीला रवींद्र सरोवर प्रकरण झोंबलेले आहे हे नाकारण्यात अर्थ नाही. बंगालच्या इतिहासात स्त्रीत्वाची अशी ही ससेहोलपट प्रायः प्रथमच झाली. तेथे स्त्रीला फार मानाचे स्थान आहे. बंगालची अधिदेवता ' काली ' ही आहे ! पण बंगाली स्त्रीचे वैशिष्ट्य हे की रवींद्र सरोवर प्रकरण तिने पचवले आहे. एक कोंडलेला हुंदका एवढे स्मरण त्या प्रकरणाचे राहते ते यामुळेच ! बंगाली स्त्रीचा पॉईज एवढा जबरदस्त की तिला या प्रकरणावर तुटून पडणाऱ्या अनेक राजकीय कोल्ह्यांची शिसारी आहे. तिचा कैवार घेणारांची तशीच तिच्या-वर वार करणारांची कोणाचीच पत्रास तिला नाही. बंगाली स्त्री मूलतः एकाकी आहे.

एकाकीपणातून येणारे सारे भावविशेष तिच्या वागणुकीत दिसतात. खचाखच गर्दीत ती सहजपणे शिरते. तिच्या अर्धवट दिसणाऱ्या उरोजांकडे बघणाऱ्या लाख पुरुषी नजरांची तिला तितकीशी खंत नाही. तसे करणे तिला परवडणार नाही. मी एक दिवसभर ट्राम व बसने मुद्दाम गर्दीच्या वेळी प्रवास केला. या यातायात— यात्रेत मला बंगाली स्त्री जेवढी दिसली तेवढी कोठेही दिसली नसती. रवींद्र सरोवराची छोटीमोठी आवृत्ती अपरिहार्यपणे कलकत्त्याच्या ट्राम-बसमध्ये पीक —अवर्समध्ये निघत असते. स्त्रीचे अंग त्या गर्दीत सार्वजनिक इमारतीच्या भिंती-सारखे घासले जाते.

बंगाली स्त्रीची प्रतिक्रिया ? गर्दी फार आहे. या गर्दीत राहूनच तिला जगा-वयाचे आहे. तिच्या स्त्रीत्वाचे स्तोम पुरुषांनी माजवावे. तिच्या देवतापणाचे सोंग कापुरुषांनी सजवावे. तिला त्याचे आणि कशाचेच काही घेणे नाही. जीवन हे एक देणे आहे आणि देणाराला घेणारांच्या घाईगर्दीशी जुळवून घ्यावे लागते. बस्स !

कलकत्त्याहूनच लिहिलेल्या एका पत्रात मी बंगाली स्त्रीचे वर्णन असे केले आहे—

' रिझर्व्हड यट् रिसजंट, पेटयूलंट यट् पॉईज्ड अँड हेरॅस्ड् यट् हार्टी ! '

यात काही बदल करावा असे मला वाटत नाही.

माझे भाग्य असे की मला काही बंगाली स्त्रियांशी व्यक्तिगत परिचय होण्याची

संधी मिळाली—त्याची कहाणी सांगण्यापूर्वी एका न झालेल्या परिचयाची विराणी सांगतो—असाच एका संध्याकाळी चित्तरंजन हॉस्पिटलपासून निवासाकडे येत असता माझ्या शेजारून एक सडपातळ तरुणी चालत होती. चेहरा सामान्य पण गोड. तिचे खरे बळ होते तिच्या टाचेपर्यंत पोहोचणाऱ्या दोन घसघशीत वेण्यांत !

आम्ही जवळजवळ बरोबरच चालत राहिलो. हजरा मोडपाशी डावीकडे वळलो. चालत राहिलो—एक दोनदा नजरानजर झाली. मनात आवर्त उठून राहिले होते—पण तेवढेच ! चालत चालत ती सुकेशा पुढे निघून गेली—आम्ही निवासापाशी दरवानाची चौकशी करीत विचारीत उभे राहिलो. पाच मिनिटे कशीबशी काढली आणि टॅक्सीला हात केला. टॅक्सीवाल्याला सांगितले ऐसे सीधे जाते रहना और मोडपर रामकृष्ण हॉस्पिटलके तरफ लेना !

टॅक्सी जात राहिली – सुकेशा भेटली नाही !

अजून वाटते तिचा परिचय झाला असता तर बंगाली स्त्रीचे कोडे सरसर सुटले असते !

आता व्यक्तिशः परिचय झालेल्या तरुणींविषयी ! त्यांच्या सोयीसाठी त्यांची नावे बदलीत आहे— लॉरेटा, लिलीया, ट्रंपेटा आणि टानिया अशी त्यांची नावे आपण समजू या !

पहिली ओळख लॉरेटाशी झाली. सकाळी साडेसात वाजता तिच्या 'बाडी'त गेलो. मुलगी स्वतः रवींद्र सरोवर कार्यक्रमास हजर होती. म्हणूनच ओळख काढली होती.

दोन तास आमचे डिस्कशन झाले. रवींद्र सरोवरविषयीचा तिचा अनुभव 'सरोवर' या लेखात येऊन गेलाच आहे. तिच्याशी चार दिवस रोज दोन तास याप्रमाणे चर्चा करून त्या अनुभवाची संगती जुळवली आहे एवढेच सांगतो.

आठ तास आम्ही कसली चर्चा केली ? आम्ही सरोवरापुरते मर्यादित राहिलो नाही – या लेखमालेच्या प्रत्येक लेखाच्या स्वरूपाविषयी आम्ही बोललो. तसे तर या लेखमालेचे श्रेय तिला !

लॉरेटा— वय वर्षे एकोणीस-शिक्षणशास्त्राची पदवीधर – दहा वर्षे चंद्रनगरच्या फ्रेंच वसाहतीत काढलेली – गेली तीन वर्षे कलकत्त्यात – शिक्षणशास्त्रातच पोस्ट-ग्रॅज्युएट होण्याची इच्छा – अडचण ?

कलकत्ता युनिव्हर्सिटीला रोज नियमित पोहोचणे हे एक दिव्यच आहे. रोड-साईड रोमियोंचा षंढ त्रास आहेच. शिवाय ट्रॅफिक जाम, युनिव्हर्सिटीमधील संप—घेरावो, मोर्चे—लाठीमार, अश्रुधूर वगैरे सारे साग्रसंगीत !

लॉरेटा सांगते—दंगा पोरेच करतात आणि पळून जातात. लाठी मात्र एखाद्या मुलीच्या डोक्यात बसते. पोलिसांचा अश्रुधूर मुलींच्याच डोळ्यांतून पाणी काढतो.

पण एवढेच ! या मुलींच्या डोळ्यांत पाणी येत असेल तर हे एवढ्याच

कारणाने ! लॉरेटा स्वत: कमालाची शांत व बेडर आहे. कलकत्त्याच्या शिक्षण-क्षेत्रातील अनेक हीन कारवाया तिने मला मखपणे सांगितल्या. कलकत्ता युनिव्हर्सिटीत मुलांच्या बरोबरीने मुलीही नक्षलवादी आहेत हे तिने मला सांगितले. कॉलेज स्ट्रीटला जाण्यात कितीही अडचणी असल्या आणि तिचे पिताजी तिला मुंबईला जाण्यास सांगत असले तरी लॉरेटा मात्र कलकत्ता युनिव्हर्सिटीतच जाणार आहे !

लॉरेटा म्हणजे कॉन्फ्रॉन्टेशन सामना ! मी जरनॅलिस्ट, वगैरेंची झूल पांघरून तिच्याशी बोलण्यास प्रारंभ करताच तिने मला पहिल्या दहा मिनिटांतच साफ उडवले. कलकत्त्यावर तिचे ज्वलंत प्रेम. या मवालीगिरीचा तुम्ही संघटित बंदोबस्त का करू शकत नाही ? असे विचारता तिची उत्तरे दोन. एकतर बंगाली स्त्री पराकोटीची रिझर्व्हड् आहे. तिच्याने हे काही होणार नाही. दुसरे म्हणजे मुलेदेखील वाटतात तितकी वाईट नसतात. (घ्या – म्हणजे आम्ही शिवाजी महाराजांचे नाव घेऊन शेकडो मैल आलो ते फुकटच ?) राजकीय पुढाऱ्यांनी यात लक्ष घालू नये. तरुणांचे जग वेगळे !

मुलगी हुशार ! माझीच काही तर्कपद्धती उचलून मलाच तिने नॉनप्लस केले. थोडक्यात म्हणजे मी जे बोलेन त्याच्या अगदी उलट बोलायचे हा तिने केलेला पण असावा. त्यामुळेच मला बंगाली युवतीची थोडी ओळख पटली म्हणा !

लिलिया ही लॉरेटाची मैत्रीण. बंगाली–वय वर्षे वीस–विषय [झूलॉजी किंवा असाच काही तरी ! ग्रॅज्युएट क्लासला या वर्षी जाईल. प्रकृती सौम्य–स्वर मऊ पण डोळे थेट लॉरेटासारखे. मवालीगिरीस पायबंद घालण्याविषयी ती लॉरेटाएवढी निराश नव्हती. काही करता येईल असे तिचे म्हणणे. पण नेतृत्व पाहिजे.

लिलियाशी बोलताना खरी गती आली ती शरद साहित्यावर बोलत असताना. आम्ही शरद संपूर्ण वाचलेला. (कलकत्त्याची ही ‘ माणूस ’ची असाइनमेंट घेण्यात फारशी खळखळ केली नाही याचे कारण आमचा शरद-माईंडेडनेस ! ) सुरुवातीस मी कोणाचा उल्लेख करीत आहे हेच लिलियाला कळेना ! ‘ शोरोदो ’ असे तिने पाच सहा वेळा सांगताच मग माझीही ट्यूब लागली.

बंगालच्या जीवनावर स्त्रीची हुकूमत आहे असे एक विधान मी करताच लॉरेटा आणि लिलीया दोघी चवताळून उठल्या (व तेथल्या तेथे त्यांनी माझ्या विधानाचा पडताळाच दिला ! ) स्त्रीला किती छळणा होते आहे याचे त्यांनी संयुक्त वर्णन केले–त्यांच्या शब्दांकडे माझे लक्ष नव्हते. मी धावत होतो तो त्यांच्या भिरभिरणाऱ्या भर्जरी नजरांमागे ! या नजरा अखेरपर्यंत नाचऱ्याच राहिल्या–या नाचऱ्या नजरांना माझा मराठी मुजरा !

ट्रंपेटा हे एक अती जहाल प्रकरण आहे. सात दिवस मी या भूमिकन्येची भेट घेण्याची धडपड करीत होतो. त्यासाठी तिच्या होम डिस्ट्रिक्टकडे–बिरभूमलाही

जाण्यास निघालो होतो. पण माझे नशीब अखेरीस जोरावर आले. एका गदमदत्या सायंकाळी साडेचार वाजता ही ' क्रांतिची कन्या ' मला भेटली. केव्हा व कुठे भेटावयाचे हे ठरविता ठरविता आम्ही तेथेच तासभर चर्चा केली व नंतर हे एकमेकांना बजावून आम्ही निरोप घेतला.

ट्रंपेटा ही बिरभूम जिल्ह्याची अनभिषिक्त राणी. शेतकऱ्यांचे लढे लढवणारी. त्यांच्या मलीन जीवनात अंगार फुलवणारी. क्रांतीला घोषणांची गरज नाही ती शोषणातून आपोआप जन्म पावते असे सांगणारी. भोकरासारख्या डोळयांनी समोरच्या व्यक्तीस खाऊन टाकणारी ही बतीस वर्षांची मुलगी कम-बाई ! खरे म्हणजे बाईच !

हिची बत्तीशी वठेल किंवा नाही हे मला ठाऊक नाही, पण ती जे बोलली ते असे– क्रांतीखेरीज पर्याय नाही. आज शेतकरी जनावरांहून वाईट जिणे जगत आहेत. त्यांच्यासाठी आम्ही काय करतो आहोत ? ही निव्वळ फसवणूक आहे. राज्यघटना हा एक खोडा आहे. किसानांच्या स्वयंभू सामर्थ्यावर आधारित अशी देशव्यापी क्रांती हे आमचे ध्येय आहे. ते भावनेवर भर देऊन होणार नाही. त्यासाठी कठोर सिद्धांतांची मुळापासून पेरणी करणे जरूर आहे. आधी ही मशागत आम्ही करतो आहोत. सिद्धांतरूपी केंद्रीकरण व अंतर्विरोधी समाजव्यवस्था यांचा सामना एक दिवस जरूर होईल. तो भारताच्या कोनाकोपऱ्यात होईल. त्यातून क्रांतीचा लोळ वर उठेल. अनेकांना तो वर घेईल आणि काही मूठभरांना तो पाताळात गाडून टाकील. हे कार्य काळाच्या फूटपट्टीत मापण्यासारखे नाही. झोपडपट्टीला आणि ग्रामीण जनतेला आपली पट्टी सापडली की हे कार्य क्षणार्धात होईल. एक गोलार्ध व्यापून टाकणारी चळवळ या क्रांतीची पाठराखण करीत आहे हे विसरू नका. !

प्रथम माझ्याकडून तुम्हाला काय मिळणार असे गुळमुळीत बोलणारी ही क्रांतिकन्या नंतर अशा आवेगाने सुसाट बोलत राहिली की आपण तर तबा झालो.

तिचे बोलणे ऐकताना वाटले की हिची बत्तीशी वठो अथवा न वठो–ही मात्र क्रांतीच्या कहारी कल्लोळातदेखील कधीही वठणार नाही. सदैव टवटवीत राहील. क्रांतीची ही कन्या क्रांतीची माता होईल.

एखाद्या खट्याळ पोराप्रमाणे मी ट्रंपेटाला खूप छेडले. तिने सांगितलेले क्रांतीचे तत्त्वज्ञान मला अर्थातच अज्ञात नव्हते. मला ते फार फार साधे वाटते एवढेच ! माझ्या एकेका प्रश्नासरशी ती आणखीनच उसळत होती–पण मूळ विषयाशी मिसळत नव्हती असे मला सारखे वाटत होते.

अखेरीस एका दुष्ट क्षणी माझ्या लक्षात आले की ही क्रांतीचे केवळ ट्रंपेट आहे. ठराविक व ढोबळ सूरच तिच्यामधून निघू शकतात. सुरांचे स्वातंत्र्य व स्वातंत्र्याचा बुलंद सूर या दोन्हींपासून ही ट्रंपेटा वंचित आहे. मला मनोमन वाईट वाटले. तिलाही माझे अफाट अज्ञान व प्रश्न पाहून वाईट वाटले असेल. एकमेकांबद्दल वाईट वाटणे हे संचित काय थोडे झाले ?

टानियाशी माझी गाठ या जन्मी पडली नसती. मुंबईला येणारे माझे विमान रद्द झाले व मी कलकत्त्यात अडकून पडलो. मुंबईच्या संपाची बातमी विचारणे व बियर पीत वेळ काढणे एवढेच हाती होते.

शेवटी दोन दिवस असे काढल्यावर मी चक्रावून गेलो. ३१ तारखेला शनिवारी सकाळी ८ वाजता इंडियन एअर लाईन्सच्या सिटी बुकिंग ऑफिसात जाऊन ठिय्या दिला. मुंबईची हालत बुरी होती म्हणून मी तिकीट बदलून घेऊन सायंकाळच्या फ्लाईटने दिल्लीस जाण्याचे ठरविले. तिकीट हाती पडताच मी पुन्हा व्हेकंट झालो. एक अभावित हालचाल म्हणून तेथल्या रिसेप्शन काँटरवर जाऊन बसलो.

काँटरवर एकच मुलगी होती—बंगाली—'सुनोतो—सुनोतो—आशे आशे' असे गोलदार आवाजात बोलणारी ती गोलदार मुलगी पाहत मी बसून राहिलो. कामाची गर्दी अचाट होती. एका एका वेळी तीन तीन फोन वाजत—एकदम पाचपाच पासिंजर चोकशा करीत. बहुतेक चौकशा व फोन्स बाँबेबद्दलच होते. नकळत मी टानियाचे फोन्स घेऊ लागलो. पासिंजरांना अटेंड करू लागलो. प्रथम टानिया नको नको म्हणे पण तीदेखील विलक्षण थकली होती. तिचा विरोध तोंडदेखला होता. मी ते ओळखून तिच्या कामात हात देत राहिलो. चार तासपर्यंत आम्ही कलीग-इन-आर्म्स होतो.





बृहन्मुंबईकरिता वितरक

**मे. बी. जयंतीलाल ॲण्ड को.**, १५ मंगलदास रोड, मुंबई २

बृहन्मुंबईखेरीज महाराष्ट्रासाठी वितरक

**मे. एस्. एम्. प्रभू ॲण्ड सन्स**, १५ हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७

टेलिफोन्सच्या धमालीत आम्ही गप्पा मारू लागलो–इकडच्या तिकडच्या–आमचे कलीगचे नाते आता व्यक्तित्व धारण करू लागले होते.

मध्येच एकदा वैतागाने फोन आदळत टानिया म्हणाली "आय वाँट टू गेट अवे फ्रॉम धिस फोन फॉर फाईव् मिनिटस." मी शांतपणे बोललो, "तू जा–मी किल्ला सांभाळतो." पण तिने ऐकले नाही. किल्ली दिलेल्या बाहुलीप्रमाणे ती काम करीत राहिली. हसतमुखाने. तिच्या केसांच्या विस्कटलेल्या बटांखेरीज तिच्या व्यक्तिमत्त्वावर कसलेही थकव्याचे लक्षण नव्हते !

काम काय किंवा आराम काय केव्हातरी त्याचा शेवट होत असतो. काम संपल्याचा खेद मला त्या दिवशी प्रथमच झाला. (टानिया फार सुंदर व तरुण आहे हे सांगणे नकोच).

दोन वाजता तिची ड्युटी संपली. तिचा मी निरोप घेतला आणि इंडियन एअरलाईन्सने आम्हांला ज्या हॉटेलात टाकले होते त्या ग्रँड हॉटेलात गेलो.

बॅग घेऊन तीन वाजता परत सिटी बुकिंग ऑफिसात आलो आणि चक्क कोसळलो.

टानिया कौंटरवर होती–नव्याने टवटवीत झालेली–दोन्ही कानांना दोन फोन्स लावून समोरच्या गलेलठ्ठ पासिंजरास गोहत्ती फ्लाईटची न्यूज सांगणारी !

मी तरातरा तिच्याकडे गेलो आणि ओरडलो, "तू पुन्हा – काय आहे काय ?"

टानिया शांतपणे म्हणाली, 'मला एक्स्टेंडेड ड्यूटी आहे आज संध्याकाळी साडेआठपर्यंत.'

'ही पिळवणूक आहे – मी गुहाबाबूला सांगतो.' (या वेळेपर्यंत मी युनियन लीडर गुहा यांची ओळख काढली होती.)

'जाऊ द्या – मला सवय आहे. मी फार लहान व्यक्ती आहे. माझ्यासाठी तुम्ही तसदी घेऊ नका.' – टानिया एका फॉरिनरला ड्यूटी ऑफिसरकडे पाठवीत म्हणाली.

आता काय बोलणार ? मी एवढेच म्हणालो, 'माझी फ्लाईट सव्वाचारला आहे. कोत्र इज लिव्हिंग – गुडबाय अँड गुडलक – इट वॉज नाईस टु हॅव वर्क्ड वुईथ यू.'

एवढ्या बडबडीला टानियाचे उत्तर म्हणजे एक महिरपी हास्य – खलास !

त्या चार तासांच्या अवधीत मी तिला मूर्खासारखी सिगरिट ऑफर केली. चहाला जाऊ म्हणून मागे लागलो. ती स्वतः रवींद्र सरोवरच्या कार्यक्रमाला हजर होती म्हणून ही सारी धडपड !

तिने निग्रहाने नकार दिला – इथे मी तुम्हांला ड्रिंक पाजते अशी विनवणी केली. एक अत्याधुनिक पण अतीत अशी बंगाली तरुणी मला आपले दर्शन देऊन गेली. ते प्रदर्शन नव्हते – सुदर्शन होते !

लॉरेटा, लिलिया, ट्रंपेटा आणि टानिया या प्रातिनिधिक आहेत असा माझा दावा

नाही. मला प्रातिनिधिक संपर्क हवा असता तर मी ऑल इंडिया वुमेन्स कौन्सिल, महिला संसद वगैरेत गेलो असतो. गेलो नाही तेच बरे झाले !

माझ्या बुद्धीप्रमाणे टानिया ही बंगाली तरुणीची खरीखुरी प्रतिनिधी आहे – कोसळेस्तवर काम करणारी, मनमोकळी पण समाजास भिणारी. जाता जाता अनेक मुशाफिरांना आनंद देणारी टानिया ही बंगालची सरिता आहे. सरोवर कितीही वाह्यात झाले तरी अखेरीस ते सरितेचे अपत्य आहे. हा विश्वास सरितेला पुढे नेत असतो. नित्य नवीन सामर्थ्य घेऊन, ते सामर्थ्य भोवताली उधळून टाकीत सरिता आपला मार्ग आक्रमीत असते. सागर तिला 'गाज' देत असतो. अनावरपणे तिलाही त्याच्याकडे जावयाचे असते. पण वाटेवरचे कामही महत्त्वाचे आहे. आपली मर्यादा सांभाळणे महत्त्वाचे आहे हे सरिता केव्हाही विसरत नाही.

'मर्यादा' शब्दावरून आठवण झाली. लॉरेटाला मी डिनर देऊ इच्छीत होतो. तिने साहजिकच ते आमंत्रण नाकारले. कामाच्या गडबडीत कलकत्ता सोडताना मी तिला भेटू शकलो नाही. रात्री सव्वानऊ वाजता डमडम विमानतळावर तिचा टेलिफोन आला. विमान सुटण्यापूर्वी दहा मिनिटे केवळ माझे आभार मानण्यासाठी. हा भार माझ्यावर पडल्यानेच माझे ते विमान रद्द झाले व दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा माझी व लॉरेटाची भेट झाली – दिलखुलास चर्चा झाली.

अशी ही बंगालची सरिता. बंगालची स्त्री सरितेसारखी आहे तर बंगाली तरुण हा सागरासारखा आहे; किंवा अधिक काटेकोरपणे बोलावयाचे तर 'उप'सागरासारखा !

या सागरांच्या पोटात थैमान चालू आहे. अनेक विचित्र प्राणी त्याच्या सिस्टिममध्ये वावरत आहेत. सागर असल्याने त्याला दिशा नाही. जागच्या जागी हेलावणे, गरजणे आणि लाटा परजणे एवढेच तो करू शकतो. चडफडतो – कधी वेड्यासारखा सुन्न पडून राहतो.

निश्चित दिशा असलेल्या सरितेची त्याला ओढ आहे – अशा एखाद्या सरितेची तो प्रतिक्षा करीत आहे. (क्रमशः)

स्वादिष्ट मिठाईसाठी आम जनतेची निवड

**शर्मा स्वीट मार्ट**

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.

अशोक विठ्ठल खरे

# अणकी प्राक्षे

तो एक फारच मुत्सद्दीपणाने आयोजित केलेला समारंभ होता आणि अगदी खरेच बोलायचे तर तो मुत्सद्दी लोकांचाच समारंभ होता. त्यांच्यात मला एकदमच परक्यासारखे वाटत होते. म्हणून मी पलीकडच्या टेबलाभोवती बसलेल्या अद्ययावत् पोषाखातील मंडळींशेजारी उभा राहिलो. मी आजपर्यंत अनेक समारंभांस उपस्थित राहिलोय, पण बऱ्याच वेळा आपली 'अबोल' राहून शोभा होऊ नये म्हणून मला मुद्दाम खोकावे लागते.

मी ज्यांच्या शेजारी आता उभा होतो त्यांतील दोघेजण फारच हातवारे करून बोलत होते. मी त्यांच्यात सहभागी होताच मी माझी ओळख करून दिली. त्यांनी मंदस्मित करीत माझ्याशी हस्तांदोलन केले, पण त्यानंतर मात्र त्यांना जणू माझ्या अस्तित्वाचा विसर पडला. त्यांच्यापैकी एकाचेही नाव मला माहीत नव्हते, तसेच ते काय बोलत होते तेही समजत नव्हते. त्यांच्यापैकी ठेंगूसा, चौरस चेहऱ्याचा, जाडसर नाकाचा आग्नेय आशियायी होता यात शंकाच नाही. त्याच्याशी बोलणारा वयातीत हा भारतीय दिसत होता; कारण त्याचा उल्लेख मि. गुप्ता म्हणून होत होता नि गुप्तांकडे पाहताच माझे मत फारसे वाईट झाले नाही. परंतु एकंदर त्यांच्या कातडीचा रंग मात्र किळसवाणा वाटला.

आता मात्र ते काय बोलत आहेत, याचा मला अंदाज येत होता. ते हिंदू संस्कृतीच्या प्राचीन वैभवावर आपली मते जोरजोरात मांडत होते.

"इंडोनेशियन बेटात राहणारे रहिवासी एकेकाळी हिंदू होते. अंगकोरबद्दल तुम्हांला माहिती असेलच नाही का?" मि. गुप्ता त्या आग्नेय आशियायी माणसाला सांगत होते.

"छे! त्यावर कोणाचा विश्वास बसेल! निदान आम्ही इंडोनेशियन तरी तसं मानीत नाही." त्याच्या बोलण्यातून एक प्रकारचा तिरस्कार व्यक्त होत



होता. कदाचित् आपल्या संस्कृतीचा उगम भारतीय संस्कृतीतून झाला आहे हे त्यांचे मत त्याला आवडले नसावे. पण गुप्तासाहेब चांगलेच बेरकी होते. त्यांचे प्रवचन चालूच होते. "अहो, ते इतिहासाविरुद्ध आहे. तुमच्या देशात मध्यावर वसलेलं बाली बेट तर अजूनही हिंदू आहे." गुप्तासाहेब आता इतिहासाचे वेग-वेगळे दाखले देऊन आपले विधान पटवून देत होते. पण आता विषय बदललाच पाहिजे, या निर्णयाप्रत मी आलो आणि मध्येच त्या इंडोनेशियनाला म्हणालो,

"छे ! छे !! काय उकाडा. तुमच्या देशात इतका उकाडा असतो का हो ?"

"बिलकूल नाही. हां. हवा दमट असते. पण सर्वत्र कसं हिरवंगार निसर्गदृश्य असतं." त्याने भारतात कसे रुक्ष वाटते ते वेगळ्या भाषेत सांगितले.

गुप्तांना संभाषणातून बाजूस सारण्यासाठी म्हणून मी पुढे म्हणालो,

"दमट हवा मला बिलकूल पसंत नाही. कसं उबल्यासारखं होतं. कसल्याही प्रकारची हालचाल करण्याची उमखा राहत नाही. त्या मानाने मग वाळवंटी कोरडी

हवाच मी पसंत करीन. दिल्ली मला आवडते त्याचं हेच कारण."

"दिल्लीची हवा संपूर्ण कोरडी नाही. संपूर्ण कोरडी हवा याहीपेक्षा जास्त गरम असते." त्याला हा विषय सोडायचा नव्हता; कारण मि. गुप्ता मध्येच येतील याची त्याला रास्त भीती वाटत होती.

मी त्याला जास्त 'किल्ली' मारायचे ठरवले.

"वाळवंटी हवेतही फरक असतात. इजिप्तच्या पश्चिमी वाळवंटातील हवा त्या मानाने सौम्य आणि शरीराला पोषक आहे. वाळूचं वादळ मात्र डोकं उठवतं यात शंका नाही. त्याउलट सुदानमध्ये जाल तर सावलीतील उष्णतामानही १२० डिग्रीपर्यंत गेलेलं तुम्हांला आढळेल."

इतक्यात एक कोरीव मिशा राखलेला देखणा तरुण आमच्यात सामील झाला आणि स्वतःची परराष्ट्र खात्यातील मोठा अधिकारी मि. महिजा म्हणून त्याने ओळख करून दिली. तारुण्यात आढळणारा ध्येयवादीपणा, रगेलपणा, रंगेलपणा त्याच्या चेहऱ्यावरून ओसंडत होता.

तेवढ्यात बेअररने पेयांनी भरलेला ट्रे आणला. त्याच्यात एखादा विषाचा प्याला वगैरे असेल असे वाटल्यामुळे गुप्तांनी स्वतःसाठी अननसाच्या रसाची वेगळी ऑर्डर दिली. आम्ही इतरांनी त्या मदिरेच्या पेयांचा आस्वाद घेण्यास सुरुवात केली. पेले रिकामे होताच तो अधिकारी म्हणाला,

"व्हिस्की आणि बीयर! ओ हो, काय धुंदी चढते. वाईट वाटतं आमच्या देशात असली पेयं नाहीत ते. फ्रान्समध्ये इतकी उत्तमोत्तम पेयं बनवतात."

स्वारी नुकतीच फ्रान्सला जाऊन आली होती हे उघड होते. कदाचित् तेच त्याला सांगायचे असावे. इकडे मि. गुप्ता थोडीशी हालचाल करू लागले. आमची बोलणी ऐकता ऐकता त्यांच्या सहनशक्तीचा कडेलोट झाल्यासारखे वाटत होते. तसे म्हटले तर दुसऱ्यांचे ऐकून घेण्याची वृत्ती भारतीयांत एकंदर कमीच. विशेषतः राजकारणी लोकांत. उदाहरणार्थ, मंत्रीगण. या पृथ्वीतलावर जे जे वाढते वा घडते त्यापासून तो पोरींच्या फॅशन्सपर्यंतच्या सर्व विषयांवर बोलतात.

मि. गुप्ता जास्तच अस्वस्थ होत होते आणि त्याची त्या इंडोनेशियन इसमाला मजा वाटत होती. तो म्हणाला,

"मि. महिजा, आपली आवडती दारू कोणती?"

"अर्थात्च शॅम्पेन. तुमचं काय मत आहे?" मि. महिजा मला विचारत होता.

"खास करून आवडत नाही. त्यापेक्षा 'व्हाईट वाईन' इज बेटर."

"उदाहरणार्थ?" मि. महिजाने विचारले.

"चांगल्याशा द्राक्षांची किंवा ब्वलीसची."

मि. महिजांचे दारूबद्दलचे ज्ञान तुटपुंजे होते म्हणून ते गप्प राहिले. पण त्या शांततेचा मि. गुप्ता भंग करणार म्हणून की काय तो इंडोनेशियन अस्वस्थ झाला

पण मी त्याच्या मदतीस गलो.

"तुमचा विश्वास बसणार नाही. पण मी सर्वोत्कृष्ट द्राक्षे कुठं खाल्ली असतील तर ती इराकमधील त्या लहानशा खेड्यात."

तो इंडोनेशियन आता चांगलाच खुशीत आला. तो म्हणाला,

"खरंच! सांगा बरं त्याबद्दल."

"ते कोणत्याही अरबी खेड्याप्रमाणे—खरोखरी पाहता भारतीय खेड्याप्रमाणे—मातीच्या घरांनी भरलेले, पादचारी सडका व त्या बाजूने उघडी गटारे अशा प्रकारचे होते. दुसऱ्या महायुद्धातील ते दिवस. पर्शिया आणि इराक यांनी संयुक्तपणे काही लढाईचे पवित्रे टाकले. त्यामुळं आमची पश्चिमी वाळवंटातील 'युनिट-' मधून इराकमध्ये पाठवणी झाली. आमचा तंबू इराक पेट्रोलियम कंपनीच्या मालकीच्या जुन्या इमारतीत होता. मी अनेक वेळा आमच्या कंपनीची खरेदी करण्यासाठी त्या खेड्याच्या वेशीवर असलेल्या स्टोअरमध्ये जात असे. पण मी त्या खेड्यात मात्र जाण्यास घाबरायचो.

एक दिवस काय झालं? थोडेसे मित्रत्वाचे संबंध झाल्यामुळं म्हणा—पण त्या दुकानदारानं मला विचारलं की, तुम्ही एखादा पेग घ्याल का? ती भर दुपारची वेळ होती. त्या स्थानिक मद्यास शिवण्यास मन धजेना. दुकानदारानंही ते ओळखलं. तो म्हणाला,

"घाबरू नका. ती दारू मी कोणालाच विकत नाही. तुम्ही बऱ्याच वेळा येथे येता. म्हटलं, एखादा ग्लास 'ऑफर' करण्यास हरकत नाही. घेऊन तर पाहा. नाहीच आवडली तर काही बंधन नाही."

"मग मी तयार झालो. लगेच तो दुकानाच्या मागील बाजूस गेला. त्याचे ते राहण्याचे ठिकाण होते. तो फेसाळलेले मद्याचे दोन पेले घेऊन आला. मी एकच घोट घेतला आणि अगदी खरंच सांगतो, त्या प्रकारची दारू मी कधीच घेतली नव्हती. त्या मद्याची चव अजूनही माझ्या जिभेवर रेंगाळत आहे. त्यातील कडवटपणा, गोडपणा आणि आंबटपणा योग्य प्रमाणात होता.

'काय हो? ही दारू तुम्हीच बनवता?' मी दुकानदाराला विचारले.

'होय. गेली अनेक वर्षे बनवतोय.'

'कशापासून बनवता?'

'अर्थात् द्राक्षांपासून.'

'ह्या द्राक्षांपासून?' बाजूलाच द्राक्षांच्या ढिगाकडे बोट दाखवत मी काहीशा थंडपणेच विचारले. पण अजून मात्र मी एक प्रकारच्या स्वर्गीय अनुभूतीत न्हाऊन निघत होतो.

'होय. याच द्राक्षांपासून. जगातील सर्वोत्कृष्ट द्राक्षं या देशातील या भागांत तयार होतात.'

'माझ्या पाहण्यात तर आलेली नाहीत.'

'खेड्यांत जा आणि पाहा तुम्हीच' तो म्हणाला.

मी दुकानाच्या बाहेर आलो आणि वाळूच्या लाटांतून रस्त्यापाशी आलो. तसाच थोडासा पुढे गेलो. खड्यात काहीच 'जीवन' दिसत नव्हते. पुरुषवर्ग कॉफीबार-मध्ये कॉफी आणि हुक्का पीत बसला होता; तर काही तरुणी ती चविष्ट द्राक्षे परडीतून विकीत बसल्या होत्या. एवढी टपोरी द्राक्षे पाहून माझ्या तोंडाला पाणी सुटले. मी लागलीच एक शिलिंगचे नाणे टाकून त्या तरुणीकडून एक किलो द्राक्षे घेतली. मी परत दुकानात आलो आणि द्राक्षांचे घड दुकानदारासमोर ठेवले. तो इतका खूश झाला की, लगेच त्याने स्वतः बनवलेल्या एक डझनभर मद्याच्या बाटल्या दिल्या.'

"एक्सलंट स्टोरी." मि. महिजा म्हणाला.

ही गोष्ट नसून एका लहानशा प्रसंगाचे हुबेहूब वर्णन होते. आणि तेच मी सांग-णार तोच मि. गुप्ता जवळजवळ किंचाळलेच.

"मला अजूनही समजत नाही, खाण्यापिण्यात लोक इतका का रस घेतात? साधे अन्न हेच सर्वांत चांगले. गुंगी आणणारी पेये कोणाचेच भले करत नाहीत."

तेवढ्यात समोरूनच माझी हसऱ्या चेहऱ्याची पत्नी आली.

"आमचे मिस्टर एखादी गोष्ट सांगत असतील नाही! मोठे गोष्टीवेल्हाळ आहेत ते." ती म्हणाली.

"फारच झकास गोष्ट सांगितली तुमच्या मिस्टरनी."

माझ्याकडे आता प्रत्येकजण आश्चर्यतिरेकाने पाहत होता. माझ्या सांगण्यातील तथ्याबद्दल त्यांना संशय येत असावा. मी फक्त गोष्टीवेल्हाळ होतो. एखाद्याला सत्य पटवून देण्यासारखी अवघड कामगिरी कोणतीही नाही. कारण सत्याची प्रचीती घ्यायची असते.

आता जाण्याची वेळ झाली होती. मी आणि मिसेस त्या मंडळींचा निरोप घेऊन निघालो. यजमान आणि यजमानीण बाईंचा आम्ही निरोप घेतला. यजमानांनी माझी एका सुंदर दिसणाऱ्या महिलेशी ओळख करून दिली. मी तिच्याशी दोन शब्द बोलत होतो, पण आमच्या मिसेस दाराजवळ प्रश्नांकित मुद्रेने माझ्याकडे रोखून पाहत असल्याच्या पाहून मी घाईघाईत त्यांचा निरोप घेतला.

वाटेतच आमच्या मिसेसकडून आमची 'क्रॉस एक्झाम्' झाली.

"काय हो? तिच्याशी इतका वेळ काय बोलत होता?"

"खास काही नाही. मी तिला एवढेच सांगितले की, दुसऱ्या महायुद्धाच्या काळात मी तिच्या देशात काही काळ होतो."

'कोणता देश?'

'इराक' मी म्हणालो.

'ती कोण होती ?' मिसेसने उत्सुकतेने विचारले.

'इराकी वकिलाची पत्नी '

'मग काय ? तुम्हांला प्रोत्साहन मिळालं असेल ?'

'तिने विचारले की, मी कोणकोणत्या भागांत हिंडलो. मी थोडक्यात वर्णन करून सांगितले आणि इराक उत्कृष्ट द्राक्षांच्या पैदाशीत जगात अग्रेसर आहे हे सांगताच ती खूश झाली.'

'ती मघाचीच गोष्ट सांगितली परत ?'

'बरोब्बर.'

आमची उलट तपासणी संपली. ही घटना आम्ही विसरून गेलो.

नंतर जवळजवळ पंधरा दिवस गेले. असेच एकदा रात्री सिनेमा पाहून घरी आम्ही दोघेजण उशीराच आलो. दिवाणखान्यातील टेबलावर एका सुंदर परडीत द्राक्षांचा घड ठेवला होता. मी ते ताबडतोब ओळखले. पण तरीही नोकराला विचारले की, ही काय भानगड आहे ? त्याने एक सुंदरसे कार्ड आणून दिले. त्यावर लिहिले होते.


" With best compliments from the Ambassador of Iraq "


मिसेसने कार्ड वाचले. पण काहीच भाष्य केले नाही. मी इकडे तो इराकचा वकील आणि त्याच्या बायकोबद्दल विचार करीत होतो आणि इकडे आमच्या मिसेस त्या इराकी द्राक्षांचा समाचार घेत होत्या.

मी मिसेसकडे प्रश्नार्थक दृष्टीने पाहिले. पण पुनश्च ती काहीच बोलली नाही.

मी मलाच म्हणालो,

'मी गोष्ट सांगत नव्हतो. खरं ना ?' ■■



म. श्री. दीक्षित

# ग्रंथपाल

# वा. पु. कोल्हटकर

**महाराष्ट्राच्या ग्रंथालय क्षेत्रात सर्वत्र परिचित असलेले पुण्याचे ग्रंथपाल वा. पु. कोल्हटकर हे जूनमध्ये सेवानिवृत्त होत आहेत.**

मराठी साहित्याच्या व साहित्यसंलग्न क्षेत्रात केळकरांसारखी कामगिरी करणारे आणखी एक आडनाव आहे आणि ते म्हणजे कोल्हटकर. भाऊराव, श्रीपाद कृष्ण, अच्युत बळवंत, चिंतामणराव, बाळ व चित्तरंजन ही नावे सर्वपरिचित आहेत. या कोल्हटकर नामावलीत न बसणारी, पण ज्यांनी कोल्हटकरांचा वारसा अबोल कर्तृत्वाने चालवला आहे अशी आणखी दोन नावे माझ्या परिचयाची आहेत. या जोडगोळीचं नाव आहे बापू ऊर्फ प्र. श्री. कोल्हटकर आणि वा. पु. ऊर्फ ग्रंथपाल कोल्हटकर.

बापू आता सत्तरीच्या घरात आहेत. थकले आहेत. एकाकीपणे जीवन कंठीत आहेत. कधी वऱ्हाडात, तर कधी पुण्यात अशी त्यांची भ्रमंती चालू असते. डोक्याला काळी टोपी, डोळ्यांना काळा चष्मा, अंगात नेहरू शर्ट, पातळ हलकसं धोतर, पुणेरी चपला आणि हाती कातडी बॅग या नित्यपरिचित वेषात पण आपल्याच तोऱ्यात असणारे, काहीसे त्रस्त, असंतुष्ट असे बापूसाहेब मला अधूनमधून दिसतात.

पाचदहा मिनिटं आम्ही साहित्याच्या व हवापाण्याच्या गप्पा मारतो. त्यांच्या बोलण्यातला कडवटपणा मनात रेंगाळत राहतो. श्रीपाद कृष्णांच्या चिरंजिवांचा, 'संजीवनी' कारांचा व चुरचुरीत कोटीप्रधान संवादांनी युक्त अशी प्रहसने लिहिणाऱ्या नाट्यवेड्या गृहस्थाचा वृद्धाश्रम पाहून मनाला टोचणी लागते. या स्वाभिमानी, एकाकी साहित्यसेवकाकडे साहित्यिकांचे व सरकारचे जावे तितके लक्ष गेले नाही, पण अजूनही जावे असे मला वाटते.

बापूंच्या मानाने आमचे वा. पु. कोल्हटकर अधिक महत्त्वाकांक्षी व धडपडे म्हटले पाहिजेत. ग्रंथालय, ग्रंथपालन आणि ग्रंथालयीन चळवळी या तिन्हींशी गेली पंचवीस-तीस वर्षे त्यांचा निकटचा संबंध आहे. वापूंना वगळून महाराष्ट्रातील ग्रंथालयीन चळवळीचा इतिहास कुणी लिहील तर ते शक्य होणार नाही. वापू आज मुख्यतः पुण्यातील महाराष्ट्र प्रादेशिक ग्रंथालयाचे ग्रंथपाल म्हणून जरी सर्वपरिचित असले तरी त्यांची या व इतर क्षेत्रातील कामगिरी प्रशंसनीय आहे. १९४७ सालापासून महाराष्ट्र-ग्रंथालयाची वापू एखाद्या जुन्या काळच्या आजीव सेवकाप्रमाणे अत्यल्प वेतनात व अडचणीत पण निष्ठेने सेवा करीत आहेत. या ग्रंथालयाच्या उभारणीत व विकासात त्यांचा फार मोठा हात आहे. हाती घेतलेले हे कार्य करीत असता त्यांचे हातही अनेकदा पोळले. पण हार खाणे हा वापूंचा स्वभाव नाही. उपेक्षा, अडचणी, कपट आणि विरोध यांना हिमतीने व हिकमतीने तोंड देऊन त्यांनी गोखले हॉलमध्ये असतानाचे व आता विश्रामबागवाड्यातील आपले आसन बळकट राखले. अंगीकृत कार्यावर किंवा आपल्या श्रेष्ठकनिष्ठ व्यवसायावर निष्ठा असणे याला निर्विवाद फार महत्त्व असते. ज्यांच्यापाशी अशी निष्ठा असते ती माणसे


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, अजूनही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

वेस्टर्न इंडिया कं. (मान) पो. कतरीसराय (गया)

काहीतरी भरीव कार्य करून जातात. ग्रंथालयक्षेत्रात वापूंनी असे इमानदार कार्य करून एक आदर्श घालून दिला आहे.

वापूंना गेली पंधरा वर्षे तरी मी जवळून ओळखतो. आम्ही एकाच रस्त्याचे रहिवासी आणि मुशाफीर. नेहमी गाठीभेटी होतात. सदाशिव पोस्टाजवळील पेशवाई हॉटेलात तर हमखास भेट होते. ते अनेकदा वर्तमानपत्रांचे जुने अंक पाहून कात्रणे काढण्याच्या खटपटीत दिसतात. ग्रंथालय आणि साहित्य या क्षेत्रांतील त्यांची माझी आदरस्थाने समान असल्याने आमच्यातील जवळीक अधिक वाढली. वापू नी मी नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजचे वेगवेगळ्या कालखंडात दोन दोन वर्षे विद्यार्थी होतो. प्रा. डॉ. शं. दा. पेंडसे यांच्या प्रभावी अध्यापनाने आम्ही दोघेही भारावून गेलो आणि साहित्याच्या प्रांताकडे वळलो. ग्रंथसूचीकार कै. दाते आणि म. म. प्रा. पोतदार यांचा कृपालोभ हा आम्हा दोघांमधला आणखी एक स्नेहधागा. कै. बापूसाहेब माटे आणि काकासाहेब गाडगीळ हे आमचे आणखी दोन आदराचे विषय. पण या सर्वां-पेक्षाही ग्रंथप्रेम, ग्रंथवेड हा आमच्यातील स्नेहाचा मुख्य धागा आहे. वापू माझ्या-पेक्षा वयाने व कर्तृत्वाने मोठे आहेत. पण वाङमयीन वा ग्रंथालयीन प्रश्न निघाला की, ते माझ्याशी समत्व व सख्यत्व जोडतात. वापूंविषयी त्यांच्या क्षेत्रातील काही मंडळी बरं बोलत नाहीत हे मला माहीत आहे. पण त्यांच बोलणं मनी साठवूनही मला वापूंशी संगत आवडते.

वापू ज्या प्रतिकूल परिस्थितीत वाढले, शिकले व आपल्या क्षेत्रात मोठे झाले तिचा विचार करता हा माणूस ध्येयवेडा, जिद्दी, महत्त्वाकांक्षी व विलक्षण उत्साही, चळवळ्या आहे हे कुणालाही पटण्यासारखे आहे. ते जन्मले तेव्हा त्यांचे वडील हयात नव्हते. चुलत्यांनी व थोरल्या बंधूंनी त्यांचा प्रतिपाळ केला. संस्कृत पंडित कै. गो. कृ. मोडक हे त्यांचे मामा. मातोश्रीशिवाय त्यांना अन्य निकटतम असे मायेचे छत्र नव्हते. त्यांनी विद्या संपादिली ती वर उल्लेखिलेल्या पालकांच्या आधारावर व मुख्यत: स्वत:च्या हिमतीवरच. नागपूरला ते इंटर झाले, पुण्याच्या स. प. मधून बी. ए. झाले आणि बी. टी. साठी त्यांना बेळगाव गाठावे लागले. ग्रंथपाल कृ. ग. भागवत व कै. प्रि. नारळकर यांच्या प्रेरणेने मद्रासला जाऊन त्यांनी ग्रंथपालनाची डिप्-लिब् पदवी मिळविली. ही पदवी मिळविल्यानंतर मात्र अध्याप-काचा ठरविक मार्ग बदलून त्यांनी ग्रंथालयक्षेत्राची वाट धरली. या वाटेवरचा त्यांचा प्रवास अजून संपला नाही, कधी संपेल असे वाटत नाही. कारण स्पष्टच आहे. वापू केवळ पोटार्थी ग्रंथपाल नाहीत, तर हाडाचे रसिक, अभ्यासू व चांगले बहुश्रुत आहेत. ग्रंथालयक्षेत्राशी संबंधित असणाऱ्या अनेक कार्यांत ते तळमळीने भाग घेत आले. या विषयासंबंधीचे त्यांचे विपुल स्फुट व ग्रंथलेखन त्यांच्या कर्ते-पणाची साक्ष देऊ शकेल. तोंडावर वांग असणारे तरीही केतकी कांतिमान वर्णाचे, आकर्षक दिसणारे व करड्या स्वभावाचे वापू सदैव असेच कार्यरत राहावेत. ■■

पुस्तके

# अध्यात्म आणि भौतिक

वि. शं. पारगावकर

शांताराम आठवले यांचे दोन ग्रंथ

शांताराम आठवले यांची दोन पुस्तके नुकतीच वाचली. ' साधा विषय मोठा आशय ' आणि ' शांताचिया घरा. ' विषयाच्या दृष्टीने दोन्ही पुस्तके एक-मेकांपासून फार निराळी आहेत. एकात छोटी छोटी शब्दचित्रे आहेत. ती छोटी छोटी असली तरी मोठ्या लोकांची आहेत. या मोठ्या लोकांचे मोठेपण देखील एकाच जातीचे नाही. वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करून गेलेल्या या व्यक्ती आहेत. मात्र सर्वसामान्य लोकांच्या सतत नजरेसमोर असणाऱ्यांपैकी या व्यक्ती नाहीत. त्यातील पहिलीच व्यक्ती कै. अण्णासाहेब पटवर्धन ही होय. इ. स. १८४७ साली जन्मलेल्या या व्यक्तीच्या जीवनाची तशी ओळख आजच्या पिढीला नाही. श्री. ओंकारेश्वराजवळील स्मशानभूमीत अण्णासाहेब पटवर्धन यांची आज समाधी आहे. ज्याची समाधी बांधली जाते ती व्यक्ती (सामान्यांतली) सर्वसाधारणपणे साधुसंतांपैकी असते. कै. अण्णासाहेब पटवर्धन एक साधू पुरुषच होते. आज चाळीशी ओलांडलेली पुण्यातली जी एक पिढी आहे तिला कै. पटवर्धनांची एक साधुपुरुष म्हणूनच ओळख आहे. परंतु श्री. शांताराम आठवले यांनी अवघ्या चार पानात या पुरुषाचे असे शब्दचित्र उभे केले आहे की त्यामध्ये या लोकोत्तर व्यक्तीच्या जीव-नाचे सर्व सार आलेले आहे. ते उत्तम वकील होते, निष्णात वैद्य होते तसेच अर्थ-व्यवहारामध्येदेखील ते निपुण होते. एका साधुपुरुषाच्या ठायी लौकिक व्यवहाराला आवश्यक असणारेही गुण होते आणि या दोन्हींच्या मिश्रणातून पटवर्धन यांचे व्यक्तिमत्त्व कसे घडत गेले; घडले व लौकिकाप्रत पोहोचले याचे अत्यंत समर्पक, सुंदर आणि परिणामकारक वर्णन आठवले यांनी फार थोड्या शब्दांचे साहाय्य घेऊन केले आहे.

या पुस्तकात अशीच एकंदर बारा व्यक्तिचित्रे आणि प्रसंगचित्रे आहेत.

ए. जी. क्रोनीन हा एक मोठा कादंबरीकार. त्याच्या ' सिटॅडल ',' हॅटर्स कॅसल ' सारख्या गाजलेल्या कादंबऱ्या आपल्याकडील सुज्ञ वाचकांच्या परिचयाच्या आहेत. हा क्रोनीन एक प्रख्यात डॉक्टर होता. आपल्या डॉक्टरी व्यवसायात मग्न असलेल्या क्रोनीनला आपण कधी काळी प्रख्यात लेखक होऊ असे स्वप्नात देखील वाटले नसेल. परंतु दैवयोग वेगळा होता. दुसऱ्याचे रोग बरे करता करता क्रोनीन स्वतःच आजारी पडला. आतड्यातील व्रणाच्या दुखण्याने तो हैराण झाला. इतका की सहा महिने संपूर्ण विश्रांती घेतली नाही तर घडगत नाही असा डॉक्टरी सल्ला त्याला मिळाला. स्वतःची एवढी मोठी प्रॅक्टिस सोडून क्रोनीन विश्रांतीसाठी गेला आणि डॉक्टर ऐवजी लेखक होऊन परतला !

अशा वेगवेगळ्या व्यक्तींच्या जीवनांची उकल आठवले यांनी एका वेगळ्याच शलीतून निवेदन केली आहे. जशी या पुस्तकात व्यक्तिचित्रे आहेत तशीच काही क्षणचित्रे आहेत आणि योगायोगचित्रेही आहेत. काही स्वप्नचित्रे आहेत तसेच भविष्यचित्रेही आहेत. नियती, योगायोग, महात्मता, स्वप्न, भविष्य या साऱ्यांचा संबंध मानवी जीवनाशी कसा आहे, जीवनातील चढ-उतार, यशापयश, आशा-निराशा या साऱ्यांचे खेळ कसे चालतात ? कशावर चालतात ? का चालतात ? त्यामागे काही सूत्र असते का ? पूर्व संचित असते का ? जन्म आणि मृत्यू या अटळ बिंदूंच्या मधला मानवी जीवनाचा प्रवास कितपत स्वतंत्र आहे ? मानवाच्या हाती नसलेल्या त्याच्या जन्मापासून तो सुरू होतो आणि अटळ असणाऱ्या मृत्यू-पाशी तो थांबतो ! असे हे जीवनाच्या सुरुवातीवरही स्वामित्व नसलेला आणि मृत्यूवरही स्वामित्व नसलेला हा जिवंत मानव कितपत स्वतंत्र आहे, कितपत स्वतःचा स्वामी आहे ? अशा रीतीची विचारमालिका श्री. शांताराम आठवले यांचे " साधा विषय मोठा आशय ' असलेल्या पुस्तकाच्या वाचनानंतर मनात सुरू होते. त्या दृष्टीने या पुस्तकाचे महत्त्व फारच मोठे म्हणावे लागेल !

## शान्ताचिया घरा

त्यांचे दुसरे पुस्तक ' शान्ताचिया घरा ' याची प्रकृती जरा निराळी आहे. मात्र त्याच्या नाडीवर हात ठेविल्यास त्याचा जीवनधर्म त्यांच्या पहिल्या पुस्तकाशी साधर्म्य ठेवणाराच आहे असे दिसून येईल.

यातील विषय पाहिल्यास त्यात बरीच विविधता दिसून येते. कोठल्याही एका सूत्रात यातील विषय सामावलेले दिसत नाहीत. यात प्राणशक्तीची उपासना आहे, तंत्रमंत्र आहे, योगसिद्धी आहे; तसेच उपनिषदाच्या अध्यात्माचे विवेचन आहे. प्रार्थनेचे महत्त्व अध्यात्माच्या दृष्टिकोणातून सांगण्याचा पवित्रा आहे. त्यांचा पहि-लाच लेख ' नादब्रह्माची उपासना: स्तोत्रमंत्र ' हा अशाच आध्यात्मिक, अगम्य, गूढ, ब्रह्मविद्येच्या पारंपारिक ज्ञानावर अथवा श्रद्धेवर आधारलेला आहे. उदाहरणार्थ

‘ स्तोत्रमंत्रांचा पाठ ’ याची महती सांगताना श्री. शांताराम आठवले अगोदरच शंका उपस्थित करतात की हा अडाणीपणाचा वाटेल, काळाचा अपव्यय करणारा वाटेल वगैरे. त्यानंतर ते सांगतात ‘ या अशा साधनांचे महत्त्व आपल्या पूर्वजांना चांगले माहीत होते व म्हणूनच भजनपूजन, स्तोत्रमंत्र, ध्यानधारणा यांना त्यांनी दैनंदिन जीवनाचेच एक महत्त्वाचे कर्तव्य ठरवून दिले होते. ’

आठवले सांगतात त्या पूर्वजांच्या वर्तणुकीचे महत्त्व इतिहास म्हणून बरोबर आहे. परंतु केवळ इतिहास आजच्या यशस्वी जीवनास मार्गदर्शन करू शकणार नाही. आठवलेच आपल्या लेखाच्या दुसऱ्या परिच्छेदात म्हणतात त्याप्रमाणे ‘ आजचे मानवी जीवन यंत्रयुगात भौतिक प्रगतीमुळे अंतर्बाह्य पालटून गेलेले आहे. आम्ही अंतराळाचा शोध घेऊन चंद्र-मंगळांवर झेप घेण्याचा प्रयत्न करीत आहोत—पराक्रम करीत आहोत. ’ ‘ पण ’, पुढे तेच म्हणतात, ‘ आपल्या अंतरंगाचा शोध घेण्याची मात्र आम्हाला आवश्यकता वाटत नाही. आत्मबल किंवा आत्मशांति नसेल तर यांत्रिक आणि भौतिक प्रगतीमुळे प्राप्त होणारे सुख माणसाला पचविता येणार नाही. ’ आणि त्यांच्या मते, ‘ ती शांति आणि ते बळ मिळविण्यासाठी ‘ नाद-ब्रह्मा ’ची उपासना हे एक अमोघ साधन आहे. ’

येथवरचे श्री. शांताराम आठवले यांचे विवेचन पाहता त्यामध्ये तर्कविसंगतीच अधिक दिसते. आध्यात्मिकता आणि भौतिकता ही जीवनाकडे पाहण्याची दोन माध्यमे आहेत. नेमके म्हणावयाचे तर दोन दृष्टिकोण आहेत असे म्हणता येईल.

मानवी जीवन हे अपरिहार्य आहे आणि विश्वाची शांती अपरंपार आहे. मानवाला जन्माबरोबरच मृत्यूही अटळ आहे. जन्म हा त्याला सुखाचा वाटत असला तरी मृत्यू ही त्याच्या दृष्टीने दु:खद गोष्ट आहे. या एवढ्या मोठ्या अफाट अगम्य, अवर्णनीय जगात दु:ख जरी असले तरी, मानवाला जगण्याची अनिवार्य इच्छा असल्यामुळे त्याला दु:खापेक्षा सुखच अधिक भेटते ही गोष्ट आणखी कशाने तरी सिद्ध करण्याची मुळीच आवश्यकता नाही. माणसाला जगण्याची इच्छा असते आणि मरेपर्यंत तरी आपला जीव अधिक सुखात ठेवण्याची इच्छा असते.

सुख मिळविण्याची अनंत साधने आहेत. आणि या अनंत साधनांच्या अनेक वाटा आहेत. इतर प्राण्यांपेक्षा मानवाला वाचा, बुद्धी आणि कल्पनाशक्ती यांची देणगी अधिक मिळाली असल्यामुळे या शक्तींच्या साह्याने मनुष्य इतर प्राण्यांपेक्षा अधिक सुख मिळविण्याचा प्रयत्न करतो. आपल्या बुद्धीच्या सामर्थ्याने त्याने जसे या पृथ्वीचे नंदनवन बनविण्याचा प्रयत्न केला तसेच कल्पनाशक्तीच्या साह्याने त्याने स्वर्गाची कल्पना लढविली. आणि मृत्यूची तलवार सतत त्याच्या डोक्यावर टांगती असल्यामुळे त्याने परमेश्वराची कल्पनेतून निर्मिती केली. जीवन कितीही जगले तरी अपुरेच वाटते म्हणून त्याने मृत्युनंतर स्वर्गीय जीवनाची कल्पना लढविली. इतकेच नव्हे तर याच हव्यासापायी जीवन जगण्याच्या, मृत्यूवर मात करण्याच्या अनिवार ओढीपायीच

त्याने पुनर्जन्माची कल्पना अस्तित्वात आणली !

असे हे जीवनाच्या ओढीतून निर्माण झालेले एक निराळेच विश्व आहे. हळूहळू या कल्पनेतील विश्वाला त्याने मग अध्यात्माची, शास्त्राची, सिद्धातांची, मंत्रतंत्राची आणि योगविद्येची जोड दिली.

थोडक्यात म्हणजे मनुष्याचे जीवन जितके अगम्य आहे, गूढ आहे, अनिश्चित आहे, तितकेच त्याने निर्मिलेले सारे तत्त्वज्ञान, शास्त्र आणि तंत्र देखील अनिश्चित आहे ! गूढ आहे, अगम्य आहे, बेभरवशाचे आहे !

मनुष्यमात्राचे जीवन जितके क्षणभंगूर आहे तेवढीच त्याची या पृथ्वीतलावरील निर्मितीही क्षणभंगुर आहे ! कदाचित् ही दुसरी क्षणभंगुरता दीर्घायुशी असेल इतकेच. तेव्हा मला प्रामाणिकपणे एवढेच सूचित करावयाचे आहे की, ही अध्यात्मिक वृत्तीची माणसे विज्ञानाकडे आणि भौतिक जीवनाकडे ज्या उदासीन वृत्तीने पाहतात ती वृत्ती योग्य नाही. तसेच तथाकथित आधुनिक मानव या गूढगम्य अध्यात्मिक ज्ञानाकडे ज्या तुच्छतेने पाहतो हा देखील त्याचा दंभ होय.

मानवी जीवनाला दोन्हीही वाटा आवश्यक आहेत. इहलोकी अधिक सुखाने जगण्यासाठी आणि मृत्यूवर निदान शास्त्रीय आणि आध्यात्मिक दृष्टिकोणाने मात करण्यासाठी हे दोन्ही प्रकारचें जगणे मानवाला आवश्यक आहे. श्री. आठवले सांगतात तसे संत तुकाराम, ज्ञानेश्वर, एकनाथ किंवा परमहंस योगानंद हे जसे श्रेष्ठ पुरुष आहेत, संत महात्मे आहेत, तसेच आगगाडीचा शोध लावणारा स्टीफनसन, बॅक्टेरियाचा शोध लावणारा लुई पाश्चर किंवा आज अवकाश अवगाहनाचे तंत्र शोधून काढणारे शास्त्रज्ञ हे देखील तेवढेच संत आणि महात्मे होत हे अध्यात्माच्या आग्रही शिष्याने लक्षात ठेवले पाहिजे. विज्ञानाचा शोध हा चक्क मूर्खपणा आहे. त्याने आत्म्याला शांती लाभत नाही आणि नादब्रह्माची उपासना मात्र आत्मोद्धराचें एक अमोघ साधन आहे असली मूर्खपणाची विधाने करणे केवळ अडाणीपणा आहे. असल्या लोकांना भले स्वतःची कुंडलिनी जागृत करता आली किंवा पाण्याच्या पृष्ठभागावरून चालता आले तरी त्याबद्दल त्यांनी स्वतःचें सार्थक मानावे. श्री. आठवले म्हणतात, ' आत्मबल किंवा आत्मशांती नसेल तर यांत्रिक आणि भौतिक प्रगतीमुळे प्राप्त होणारे सुख माणसाला पचविता येणार नाही. ' मी म्हणतो, नादब्रह्माची उपासना हीच जर सर्वश्रेष्ठ उपासना असेल तर त्याची तरफदारी करणारा मानव हा महामानव ठरेल. मग असा महामानव एवढी एकांगी वृत्ती कशी काय धारण करू शकतो याचें मात्र आश्चर्य वाटते.

म्हणूनच, श्री. शांताराम आठवले यांचे हे पुस्तक उपयुक्त असले तरी ते संपूर्ण एकांगी आहे असे म्हणण्यावाचून गत्यंतर नाही. मात्र त्यांचे ' पतिव्रता, ' ' तुका लोकी निराळा ' आणि ' आद्य नाटककार वाल्मिकी ' हे लेख उत्कृष्ट आहेत. ■■



लेखक

**ब्रिगेडियर जे. पी. दळवी**

अनुवाद

**ॲडव्होकेट माधव कानिटकर**

लेखांक

**अठरावा**

थागला आघाडीची सूत्रे जनरल कौल यांच्या हाती ज्या क्षणी सोपविली गेली त्या क्षणी भारत–चीन युद्धाच्या गंभीर शोकपर्यवसायी नाटकाची मजल तिसऱ्या आणि अखेरच्या अंकापर्यंत गेलेली होती. ४ ऑक्टोबरला जनरल कौल विमानाने तेझपुरला आले आणि आश्चर्य असं की त्यांचे स्वागत करण्यासाठी त्यांच्यापेक्षा वरिष्ठ असलेले आर्मी कमांडर विमानतळावर जातीने हजर होते ! कुणी कुणाचा का आणि कसा धिक्कार करावा याचे नियम ठरलेले नाहीत. पण कुणी कुणाचं स्वागत कसे करायचे असते याचे नियम प्रत्येक क्षेत्रात ठरलेले आहेत–लष्करात तर आहेतच आहेत. साधा नियम असा आहे की, वरिष्ठ लष्करी अधिकारी विमानातून उतरतो तेव्हा त्याचं स्वागत त्याच्यापेक्षा कनिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्याने लष्करी शिस्तीत करायचं असतं. देऊ साधं उदाहरण ? भारताच्या एखाद्या शहरात भारताचे राष्ट्रपती विमानातून उतरणार असतील तर त्यांच्या स्वागतासाठी त्या

शहराचा मेयर विमानतळावर हजर असावा लागतो. पण भारतातल्या एखाद्या शहराचा मेयर जर दिल्लीला विमानातून उतरला तर भारताच्या राष्ट्रपतींनी विमानतळावर जाऊन त्याचं स्वागत करायचं नसतं ! जगातलं प्रत्येक शिस्तबद्ध लष्कर असल्या लहानसहान बाबतीतसुद्धा जागृत असतं. जरा कुठे कुणी शिस्त मोडली तर लगेच गहजब करतात. उगाच काट्याचा नायटा करायचा माझा हेतू नाही. मला तुम्हांला फक्त एवढच दाखवून द्यायचंय की नेहरूंचा दोस्त म्हणून म्हणा किंवा कसंही म्हणा पण जनरल कौल यांची प्रतिष्ठा भारतीय सैन्यात भल-तीच वाढली होती. इथून पुढे जनरल कौल यांचं हे महत्त्व प्रत्येक विषेश घटनांवर आपली छाप पाडणारं होतं. त्यांच्यापेक्षा वरीष्ठ दर्जा असलेल्या प्रत्येक लष्करी अधिकाऱ्याला जनरल कौलशी स्पष्ट चर्चा करण्याची चोरी होती. जनरल कौलशी भांडताना त्याचा आवाज गुदमरून जाणार होता आणि कनिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांवर डोळे वटारून जनरल कौल त्यांना दमात घेणार होते

आघाडीवरची त्या दिवशीची परिस्थिती अशी होती की जनरल सेन आणि जनरल उमराव यांच्यात अबोला निर्माण झाला होता. जनरल सेन त्यामुळे पेचात पडले होते. त्यांच्या हाताखालचे जनरल उमराव निग्रही आणि खंबीर राहून त्यांना विरोध करीत होते. त्यांच्या मताप्रमाणे आणि आखलेल्या वेळापत्रकाप्रमाणे १० ऑक्टोबरपर्यंत जी कामगिरी त्यांना पार पाडायची होती, ती तशी पार पाडता येईल या बाबतीतली आशा त्यांनी सोडून दिली होती. जर का आपण प्राप्त परि-स्थितीत चिन्यांवर राजरोस हल्ला केला तर चिनीच आपल्याला रेटतील याची खात्री पटल्यामुळे जनरल सेन मनातून हबकले होते. असं म्हणतात की, चिन्यांना हुसकून देण्याच्या ज्या तारखा ठरत होत्या त्या वेळोवेळी त्यांनी लांबणीवर टाकल्यामुळे जनरल सेननी भारत सरकारचा राग ओढवून घेतला होता. जनरल कौल यांच्या हातात भारत सरकारने चिन्यांना हुसकून देण्याच्या कामगिरीची सूत्रे दिल्यामुळे जनरल सेन यांचा जीव भांड्यात पडला. बिकट परिस्थितीतून त्यांची जनरल कौलनी अक्षरशः पुढे येऊन मुक्तता केली. हिमालय पर्वतातले भयंकर नैसर्गिक प्रश्न आणि अडचणी, आघाडीवरच्या कमांडर्सचा फॉरवर्ड पॉलिसीला असलेला विरोध आणि दुसरीकडे चिन्यांना हुसकून देण्याचा आग्रह धरणारे भारत सरकार यांचं असह्य होणार ओझं त्यांनी 'बरं झालं बाबा ! तू आलास ते. चला, मी सुटलो !' अशा अर्थाने जनरल कौलच्या डोक्यावर दिलं आणि स्वतः खांदे झटकून जरा मोकळे झाले. ७ व्या पायदळ तुकडीवर आता जनरल कौल यांची व्यक्तिगत हुकमत चालणार होती. आता आपल्याजवळ असलेले एक जनरल, दोन लेफ्टनंट जनरल्स्, एक मेजर-जनरल, आणि एक ब्रिग्रेडियर ही मंडळी पुढच्या दुर्दैवी घटनांना जबाबदार धरली जाणार होती. एका म्यान्यात दोन तलवारी राहू शकत नाहीत आणि इथे तर ५ होत्या ! ऐन युद्धात गोंधळ माजू शकेल आणि

प्रत्येकाला काहीतरी सबब सांगून जबाबदारी दुसऱ्यावर ढकलता येईल अशी आत्मघातक परिस्थिती निर्माण झाली आणि पुढे तेच झालं ! एका ब्रिगेडला ५ वेगवेगळे लोक एकाच वेळी ५ वेगवेगळे हुकूम देणार आणि पराभव झाल्यानंतर जनरल कौल म्हणायचे की '७ व्या पायदळ तुकडीचा कमांडर ब्रिगेडियर जे. पी. दळवी होता ! या पराभवाला मी जबाबदार नाही ! दळवीकडून एक्स्प्लनेशन मागवलं पाहिजे ! आणि मी म्हणायचं की 'जनरल कौल ! आधी तुम्हीच एक्स्प्लनेशन द्या ! कारण आपली ही ७ वी पायदळ तुकडी कशी तयार करण्यात आली होती आणि ती तशी कुणी तयार केली होती हे माझ्यापेक्षा तुम्हालाच जास्त चांगलं ठाऊक आहे !'

या पाच लष्करी अधिकाऱ्यांपैकी काहींच्यावर असा आरोप आणि कडवट टीका केली जाते की त्यांनी सैन्याची नको ती आणि नको तशी हालचाल घडवून आणली... आणि या टीकेवर अधिकाऱ्यांची तीव्र प्रतिक्रिया अशी आहे की 'उगाच माझ्यावर टीका नको. मी पराभवाला जबाबदार नाही !' मला प्रश्न असा पडतो की या अधिकाऱ्यांना कुणीतरी खडसावून विचारलं पाहिजे की, 'काय हो ! सातव्या पायदळ तुकडीवर तुमचीच कमांड होती ना ? नसेल तर कशावर होती हे तरी कमीतकमी सांगा !' कारण दिल्लीत 'उच्चं पातळीवरून' घेण्यात येत असलेल्या राजकीय निर्णयांच्या मर्यादा त्यांच्यावर लष्करी अधिकारी या नात्याने नव्हत्या. मग आघाडीवरच्या या जनरल्सनी केलं काय ?

ता. ४ ऑक्टोबर या दिवशी जनरल सेन, जनरल कौल आणि जनरल उमराव हे तिघे एकत्र आले होते. जनरला कौल आपल्याला असं सांगतात की 'तेजपूरला गेल्याबरोबर लेफ्टनंट जनरल सेन आणि लेफ्टनंट जनरल उमराव यांची आणि माझी भेट झाली. घोला प्रदेशात ७ व्या पायदळ तुकडीची जमवाजमव करण्यासाठी काय काय करण्यात आलेले आहे याची माहिती त्या दोघांनी मला दिली. संरक्षण मंत्र्याच्या कार्यालयात दिल्लीला झालेल्या सभेत लेफ्टनंट जनरल सेन असे म्हणाले होते की, २९ सप्टेंबरलाच आघाडीवर आपल्या तीन बटालियन्सची जमवाजमव करण्यात आलेली आहे. आणि प्रत्यक्षात ४ ऑक्टोबरला परिस्थिती अशी होती की, आपली फक्त एक बटालियन आणि वर आणखी थोडे जवानच फक्त आघाडीवर घोला प्रदेशात गेले आहेत. बाकीचे घोलापासून पश्चिमेकडे १५ मैल असलेल्या लुंपू या ठिकाणीच आहेत. त्या उंच प्रदेशात परिवहन (Transportation) करण्याचं एकमेव साधन म्हणजे हमाल ! आणि आपल्याकडे तर हमालांचा तुटवडा होता. त्यामुळे आघाडीवरची तयारी ही ठरलेल्या वेळापत्रकाच्या फार मागे होती. हमालांची आपल्याकडे कमतरता होती ती भरून काढण्यासाठी बॉर्डर रोडस् ऑर्गनायझेशनकडून लष्करी कामासाठी म्हणून जबरदस्तीने मी जवळ जवळ १००० हमालांची भरती करून घेतली आणि भारत सरकारला त्या प्रमाणे कळवले. आणखी काही पावले मी अशी टाकली की त्याचा परिणाम म्हणून

निदान ९ ऑक्टोबरपर्यंत धोला प्रदेशात ७ व्या पायदळ तुकडीची जमवाजमव होऊ शकेल अशी मला आशा वाटू लागली.'

सर्वंकष लष्करी डावपेचाच्या योजनेचा विचार नसल्यामुळे वॉलाँग येथे असलेल्या आपल्या दुसऱ्या ब्रिगेडची जनरल कौलना काहीच काळजी वाटली नाही... सध्या तिकडे लक्ष देण्याची आवश्यकता त्यांना वाटत नव्हती! जनरल कौलनी स्वतःच त्यानंतर तसा कबुलीजबाब दिलेला आहे. जनरल कौल म्हणतात, 'धोला-थागला प्रदेशातूनच चिन्यांना हुसकून देण्याचा अंतिम निर्णय भारत सरकारने घेतल्यामुळे दुसऱ्या कुठल्याही ठिकाणी चिन्यांशी सामना देण्याचा प्रश्नच उपस्थित होऊ शकत नव्हता!' वस्तुतः जवळ येऊन ठेपलेल्या भारत–चीन 'चकमकीच्या पूर्वी जनरल कौल यांनी सूत्रे कशी हलवली याचा हा उडत उडत दिलेला तपशील समाधानकारक नाही. ७ व्या पायदळ तुकडीला 'लवकर पुढे जा!' अशा अर्थाची घाई जनरल कौलनी का करायला लावली ते कौलसाहेबांनी सांगितलेलं नाही. लढाईतल्या हालचाली नुसत्या घडत नसतात तर प्रत्येक हालचालीच्या अंमलबजावणीचा स्वच्छ आणि स्पष्ट हुकूम वरून दिला गेलेला असतो. जनरल कौल यांची ही कुठली हालचाली घडवून आणण्याची पद्धत? जनरल कौलचे वरिष्ठ अधिकारी जनरल सेन यांनी जनरल कौलना तसा औपचारिक हुकूम तरी दिला होता काय? तसे करणे आवश्यक होते कारण पंतप्रधान आणि संरक्षणमंत्री या लोकनियुक्त प्रतिनिधींनी केलेले मार्गदर्शन (!) आणि व्यक्त केलेल्या इच्छा यांचे लष्करी हुकमाच्या भाषेत रुपांतर होणे आवश्यक असते. जनरल सेन यांनी जनरल कौलना जर कुठलाच हुकूम दिला नसेल तर आपण असे धरून चालायला मोकळे आहोत का, की जनरल कौलना त्यांच्यापेक्षा वरिष्ठ असलेल्या लष्करी अधिकाऱ्यांकडून कुठलाही हुकूम घेण्याची आवश्यकता नव्हती? जनरल सेन तर खंबीरपणाने असे सांगत आलेले आहेत की, 'जनरल कौल आघाडीवर आल्यानंतर त्या नेफा प्रकरणाच्या बाबतीत मला काहीच बोलता येईना!'

एकूण परिस्थितीबाबत जनरल उमराव यांची मते आणि त्यांनी व्यक्त केलेले अंदाज यांचा उल्लेख ४ ऑक्टोबरच्या भेटीत झाला होता का नव्हता? जनरल उमराव यांच्याशी जनरल कौल सहमत होते की नव्हते? या बाबतीत जनरल कौल आपल्याला काहीच सांगत नाहीत. ते कसे सांगतील? कारण ही महत्वाची माहिती दिली तर ७ व्या पायदळ तुकडीला '९ ऑक्टोबरपर्यंत नामका–चू–पर्यंत पुढे जा!' असा हुकूम कुणी दिला ते अचूक बाहेर पडेल ना!

अखेर व्हायचे तेच झाले! थागला प्रदेशात आपली फजिती झाली. लढाईचा विचका झाला! त्यानंतर जनरल कौल यांनी असा बचाव घेतला आणि स्वतः पडद्याआड जाऊन असे समर्थन करण्याचा प्रयत्न केला की, 'काय करणार? मी सूत्रे हातात घेण्यापूर्वीच काही योजना ठरल्या होत्या. त्या अमलात आणणे शक्यच

नव्हते त्याला आता मी काय करू? वा! जनरल कौल वा! अरे, जर का त्या अगोदरच ठरलेल्या असाध्य योजना होत्या तर त्या फेरबदल करता येण्यासारख्या लवचिक होत्या की फेरफार न करता येण्यासारख्या होत्या, हे जाहीर करणे हे तुमचे आवश्यक असे कर्तव्य होते आणि आहे. ता.४ ऑक्टोबरला जनरल सेन आणि जनरल उमराव यांच्याबरोबर झालेल्या एवढेच नव्हे तर त्यानंतर G.O.C. 4th डिव्हिजन आणि सातव्या पायदळ तुकडीचे कमांडर यांच्याबरोबर झालेल्या सभेत या अगोदरच ठरलेल्या असाध्य योजनांची साधी चर्चा तरी आपण केली होतीत का? हे तरी सांगा ना!

लष्करी शिस्तीतला हा नेहमीचा शिरस्ता आहे की, जे काही घडले असेल जसे घडले असेल ते खरेखरे सांगावे! जनरल कौल म्हणजे कुणी अशी व्यक्ती नव्हती की ज्यांनी मेहनत घेऊन काही लष्करी डावपेचांच्या योजना तयार केल्या होत्या. त्यांच्यावर देखरेख करण्यासाठी खास पंतप्रधान पंडित नेहरूंचा प्रतिनिधी म्हणून ते आघाडीवर आलेले होते. ४ ऑक्टोबर नंतर घडणारी प्रत्येक घटना आणि प्रसंग यांची जबाबदारी व्यक्तिशः त्यांची होती. लष्करी तयारीची पूर्ण जबाबदारी आणि विचार त्यांनीच करायचा होता. फील्ड मार्शल Von Maustein यांनी असे म्हटलंय की, "जो कोणी आघाडीवर मार्गदर्शन करण्यासाठी म्हणून जातो त्याच्या स्वतःच्या डोक्यात मोहिमेच्या मूळ कल्पनेचा पाया प्रथम शिरला पाहिजे!'

इतरांनी अगोदरच ठरवलेल्या योजना जनरल कौलनी स्वीकारल्या आणि त्या योजनांबरहुकूम कामगिरी पार पाडायचं कबूल केलं, याचा अर्थच असा होतो की त्या योजना त्यांच्या स्वतःच्या झाल्या. ज्याला आपण स्वतःच ट्रीटमेंट दिलेली होती असा पेशंट मेल्यानंतर त्याचं पोस्ट-मार्टेम करताना निष्णात डॉक्टरला असं म्हणता येईल का की, 'ह्याला मी ट्रीटमेंट देण्यापूर्वीच त्याला अमकातमका रोग झाला होता. हे मला ठाऊकच नव्हतं!' मग तू डॉक्टर कसला? जनरलचंदेखील तसंच आहे. मी सूत्र घेण्यापूर्वीच विश्वासघातकी योजना आखल्या गेल्या होत्या! त्या फक्त मी अमलात आणण्याचा प्रयत्न करीत होतो. असं 'जनरल'ला म्हणता येत नाही!

४ ऑक्टोबरलाच जनरल कौलना हे ठाऊक असायला हवं होतं की, जनरल उमरावनी जनरल सेनजवळ पुढीलप्रमाणे वस्तुस्थिती स्पष्ट केली आहे.

१. चिन्यांवर आक्रमक हल्ला करून त्यांना हुसकून द्यायचं असेल तर सांगधर या ठिकाणी विमानातून कमीत कमी ५८० टन दारूगोळा खाली टाकून तो साठवला गेला पाहिजे.

२. नामका-चू नदी अतिशय अरुंद आहे. पात्रात ओबडधोबड दगड आहेत. वाटेत जंगलं आणि उभेच्या उभे कडे कपारी आहेत. ही नदी आक्रमक हालचाल कर-

ण्याच्या दृष्टीने आपल्या मार्गात अक्षरशः पसरलेली आहे. लष्करी डावपेचांचा व्यूह रचणं जवळजवळ अशक्यच आहे. थाग-ला प्रदेशात अशा परिस्थितीत एकदम त्यांना हुसकून द्यायला जाणं म्हणजे आत्महत्या करण्यासाठी नदीवर जाण्यासारखंच आहे!

३. आपले शांततापूर्ण वाटाघाटीने प्रश्न सोडवणारे लोक कुचकामी आहेत! लष्करी डावपेच म्हणजे काय हे त्यांना अजिबात कळत नाही!

४. धोलाच्या फार अलीकडे असलेल्या आपले ३०० ते ५०० हमाल आपल्याला अपुरे पडतील. तेवढ्यावर भागायचं नाही. लुंपू येथे पडलेली रसद सांगधर या ठिकाणी वाहून नेऊन तिचा साठा करायला एवढे हमाल पुरणार नाहीत. चालत जाऊन हे काम करणं त्यांच्याच्यांनी होणार नाही.

जनरल कौल यांच्या पुस्तकातल्या मी वर उद्धृत केलेल्या उताऱ्यात एका शब्दाचा-देखील मी बदल केलेला नाही! त्यांच्याच शब्दात (verbatiam) मी तो जसाच्या तसा दिला आहे आणि माझ्या २८ सप्टेंबरच्या अहवालात मी हेच म्हटलं होतं. जनरल कौलनी माझ्या अहवालातला मूळ उतारा फक्त नकलून काढला आहे. भारत-चीन युद्धाच्या या करुण संगीत नाटकाबाबत आणखी माहिती द्यायची तर ती अशी देता येईल की, जनरल कौलना भारत-चीन यांच्यात लढाई होईल अशी कल्पनाच नव्हती! त्यांच्या मते सरहद्दीचा प्रश्न हा केवळ मतभेद होता! जनरल कौल असं म्हणतात की, जनरल उमराव यांच्याकडून सर्व अडचणी ऐकून घेतल्यानंतरदेखील त्यांनी आघाडीवर आपल्या जवानांची त्वरित जमवाजमव करण्याचा जो निर्णय घेतला त्याला पुढीलप्रमाणे काही खास कारणे होती :—

१. अनंत अडचणी असून देखील चिन्यांना हुसकून देण्याचा निर्णय जर का अमलात आणायचा होता तर चिनी सैन्य वादग्रस्त टापूत जास्त संख्येने येण्यापूर्वीच आपलं सैन्य जास्त संख्येने तिथे शत्रूच्या अगोदर पोचायला हवं होतं!

२. वादग्रस्त टापूत आपल्या जवानांची जमवाजमव करायला जर का आपण उशीर केला असता तर लवकरच धोला प्रदेशात बर्फ पडायला सुरुवात झाली असती आणि त्या हवामानामुळे आपली मोहीमच धोक्यात आली असती.

आपण हे समजू शकतो की जनरल कौल यांनी जनरल उमराव यांच्याकडून अनंत अडचणी ऐकून घेऊन देखील धोका पत्करून त्या अडचणींकडे दुर्लक्ष करायचे ठरवले आणि 'चिन्यांना हुसकून देण्याच्या निर्णयाला ते चिकटून राहिले!' पण ह्या धोका पत्करण्यात कितपत शहाणपणा होता याचा आता आपण विचार करू. डिस्पाइट अवर मेनी डिफिकल्टीज ७ व्या पायदळ तुकडीने नामका-चूपर्यंत पुढे जावे या त्यांच्या निर्णयाची आता छाननी करू! या पश्चातबुद्धीच्या युक्तिवादावर तुमचा विश्वास बसतो? एकीकडे डिस्पाईट अवर मेनी डिफिकल्टीज असेही म्हणायचे तर दुसरीकडे 'लवकर पुढे जा!' असा हुकूम द्यायचा.

ता. ४–५ ऑक्टोबरपर्यंत उत्तम तयारीत असलेले, भरपूर खाण्या-पिण्याची

व्यवस्था असलेले, पाठीमागे चांगले पाठबळ असलेले चिनी सैनिक थागला प्रदेशात चांगलेच ठाण मांडून बसलेले होते. थागला प्रदेशात येण्यासाठी त्यांना फारच चांगले रस्ते उपलब्ध होते. दळणवळणाच्या मार्गात त्यांना बिलकूल अडचणी नव्हत्या. थागला प्रदेशात ते कितीही संख्येने विनासायास येऊ शकत होते.

आणि आपल्याकडची तयारी? अक्षरश: काहीच नव्हती. अशा अवस्थेत कौल साहेब कशाच्या जोरावर असे सांगतात की 'डिस्पाइट अवर मेनी डिफिकल्टीज' मी जलद गतीने आघाडीवर आपल्या जवानांची जलद गतीने तटबंदी उभारण्याचा प्रयत्न केला? आता जनरल कौलना जे शक्य होते ती प्रचंड जमवाजमव जनरल कौल आघाडीवर येण्यापूर्वीच जनरल सेन आणि जनरल उमराव यांना करता आली नसती? तेसुद्धा जनरलच होते आणि ता. १३ सप्टेंबरपासून 'चिन्यांना हुसकून द्या!' हा भारत सरकारचा हुकूम काहीही करून अमलात आणणे हे त्यांचेही कर्तव्य होते.

एकदा का बर्फ पडायला सुरुवात झाली की जवानांची लष्करी हालचाल करायला 'बर्फ' हा एक अडथळा हे म्हणणे कसे अर्थपूर्ण होते हे थोडक्यात सांगतो. जनरल उमराव यांनी आधीच हे स्पष्ट केले होते की जर का बर्फ पडायला लागण्यापूर्वी ठरल्याप्रमाणे आघाडीवर ५८० टन दारूगोळा जमा करून देण्यात आपले हमाल अयशस्वी ठरले तर १९६३ च्या वसंत ऋतुपर्यंत आपल्याला आपली लष्करी कारवाई लांबणीवर टाकावी लागेल. जर का तत्पूर्वीच बर्फ पडायला सुरुवात झाली तर आपली मोहीम धोक्यात येईल इतकेच नव्हे तर त्या मोहिमेचा सत्यानाश होईल. जनरल कौल यांचा असा तर हेतू नव्हता ना की बर्फ पडायला लागण्यापूर्वीच आपण चिन्यांचे थोबाड फोडून त्यांचा चक्काचूर करून टाकू आणि लगेच घाईघाईने लुंपू या सुरक्षित ठिकाणी परत येऊ! कारण त्यांचे थोबाड फोडून झाल्यानंतर लगेच जर का बर्फ पडायला लागला तर नामका-चूच्या परिसरातून लुंपूला परत यायला मिळणार नाही! ...... आणि मग भलतीच आफत येईल!

'नामका-चूपर्यंत लवकर पुढे जा!' असा उतावळा निर्णय घेण्याची जनरल कौलनी जी कारणं सांगितली आहेत ती पटत नाहीत. ज्या पद्धतीने जवान 'पुढे' नेले गेले त्यावरून एक गोष्ट स्पष्ट होत होती की राजकारणाने लष्कराला दाबून टाकलेले आहे. पंडित जवाहरलाल नेहरूंनी जनरल कौलला कळकळीची विनंती करून सांगितले होते की, "बाबा रे! आता तू तरी काहीतरी कर! पण त्या चिन्यांना आणखी पुढे येऊ देऊ नको! नाहीतर भारतीय जनतेचा माझ्या सरकारवरचा विश्वास उडेल!" पंडित नेहरूंचा असा विश्वास होता की, 'चिनी भारताविरुद्ध कुठलीही जोरदार हालचाल करणार नाहीत. चीनला युद्ध नको आहे! आता प्रत्यक्ष नेहरूंकडून एवढे कळल्यावर मग काय विचारता? दिसेल त्याला जनरल कौल हुकूम देत सुटले की, 'ऐऽ! आधी पुढे जा!' त्याचाच संभाव्य

परिणाम म्हणून बेफिकीरीने त्यांनी ७ वी पायदळ तुकडी ९ ऑक्टोबरपर्यंत नामका-चू पर्यंत पुढे जाईल, अशी पावलं त्यांनी टाकली.

नेफामध्ये आपल्याला का माघार घ्यावी लागली याचा जनरल कौलनी जर का नीट विचार केला असता तर कमीत कमी त्यांच्या स्वतःशी प्रामाणिक राहून त्यांनी भारतीय जनतेला हे पटवून दिले असते की " आपल्या चुकांचं प्रायश्चित्त इतक्या लवकर आणि इतके भयंकर देतील अशी मला त्या वेळी कल्पना नव्हती ! " हे वाक्य माझे नाही हं ? जनरल कौल यांचेच मूळ इंग्रजी वाक्य असे आहे की " a swift and catastrophic retribution. " आता बोला !

४ ऑक्टोबरला–ज्या दिवशी जनरल सेन, जनरल कौल आणि जनरल उमराव या 'तीन बड्यांची' शिखर परिषद भरली होती-त्याच दिवशी सकाळी ९–३० वाजता जनरल प्रसाद मला लूंपूला भेटले. ताजी बातमी काय आहे ? हे त्यांच्याकडून ऐकण्यासाठी आम्ही त्यांची उत्सुकतेने वाटच पाहत होतो. २९ सप्टेंबरपासून निर्माण झालेली सामसूम आमचा कपाळशूळ उठवीत होती. मी जनरल प्रसादना उतावळा होऊन विचारलं " काय झालं ? आपल्या अहवालाच्या बाबतीत वरचे लोक काय म्हणतात ? " त्यावर जनरल प्रसादनी मला थक्क करून टाकणारे उत्तर दिले. जनरल प्रसाद मला म्हणाले " हे बघ, माझ्या राजा ! तुझ्या त्या अहवालात कुणालाही इंटरेस्ट नाही आहे, सगळ्यांचं लक्ष फक्त त्यांच्या त्या डी–डे कडे–चिन्यांना हुसकून देण्याच्या दिवसाकडे आहे ! " जनरल प्रसादांनी पुढे जोर देऊन सांगितलं की परिणाम काहीही होवोत राजकीय कारणांसाठी आपल्याला चिन्यांवर ताबडतोब चढाई करायलाच पाहिजे ! (Look old boy, no one is interested in your bloody appreciation ... The operation had to be mounted immediately for political reasons, whatever the consequences.)

त्यानंतर त्यांनी ' चिन्यांना हुसकून देण्याच्या कामगिरीला जलद गती आणण्यासाठी एका नव्या कोअरचे GOC म्हणून जनरल कौल यांची नेमणूक झाली आहे ' ही मन अस्वस्थ करून टाकणारी बातमी सांगितली. जनरल कौल हे ४ थ्या कोअरचे कमांडर झालेले आहेत यापेक्षा जास्त काहीच माहिती जनरल प्रसादना नव्हती. प्रत्येकाला हे ठाऊक होतं की लष्करातली कोअर ही कधी जादूची कांडी फिरवून अशी क्षणात निर्माण करता येत नाही. या नव्या नेमणुकीची बातमी ऐकून प्रत्येकाला मनस्ताप झाला कारण या नेमणुकीत लष्करी विचारसरणीपेक्षा राजकारणच जास्त आहे ही गोष्ट उघडउघड लक्षात येत होती. मोहीमेची योजना आखीत असताना मधेच आघाडीवरच्या कमांडरची अशी नाटयपूर्ण पण निरर्थक बदली राजकारणाशिवाय दुसरं काय दाखवीत होती ? आपल्याला आघाडीवर जास्त डोकी नको होती, तर जास्त शस्त्रास्त्रं हवी होती. जनरल उमराव यांनी सरकारचा विश्वास गमावला आहे हा या बदलीतून ध्वनित होणारा स्पष्ट अर्थ

पाहून तर मी तत्क्षणीच भयचकित झालो. कारण जनरल उमराव यांच्यावर आमचा पूर्ण विश्वास होता. एकतर स्थानिक लष्करी परिस्थितीचं त्यांना चांगलं ज्ञान होतं आणि दुसरं म्हणजे जर का कुणी उगाच डोळे वटारले तर त्याला तोंड देण्याचं नैतिक सामर्थ्य त्यांच्याजवळ होतं.

माझ्या मेहनत घेऊन सादर केलेल्या अहवालाला केराची टोपली दाखवली गेलेली आहे आणि आघाडीवरचा नवा कमांडर म्हणून जनरल कौल यांची खास नेमणूक झालेली आहे या दोन बातम्या सांगून झाल्यानंतर जनरल प्रसाद माझ्याकडे वळले आणि त्यांनी मला हुकूम दिला की, " आता तू इथे एक क्षणभरदेखील थांबून कोस ! ताबडतोब नीघ आणि नाम–का-चू कडे रवाना हो ! जनरल कौल येताहेत, त्यांनी जर का तुला इथे लुंपूमध्ये पाहिला तर ते भयंकर संतापतील ! " जनरल प्रसाद मला हे मात्र सांगू शकले नाहीत की दळवी कुठे असावा हे ठरवण्यात एवढा रस कुणी का घ्यावा ? काही विशेष ? मला जनरल प्रसादांचं या गोष्टीकडे लक्ष वेधणं भाग पडलं की " मी कुठल्या ठिकाणी असावं याचा निश्चित हुकूम मला अद्याप मिळालेलाच नाही " मी त्यांना पुढे असंही म्हटलं की " कुणीतरी येतोय या धास्तीने अंधाऱ्या रात्री चोरासारखं झपाट्याने पळत सुटणं हे वरीष्ठ आणि अनुभवी लष्करी अधिकाऱ्यांना शोभत नाही ! " आपल्याला कुणापासून भीती होती ? चिन्यांपासून का आपल्याच सैन्यातल्या कमांडरपासून ? मी जनरल प्रसादना स्वच्छ सांगून टाकलं की " आता सकाळचे ९॥ झाल्येत आणि या प्रदेशातल्या एका दिवसाचा प्रवास करायचा म्हणजे यापेक्षा कितीतरी लवकर निघावं लागतं. निघायला आता फार उशीर झालाय. " त्यावर माझ्या हाता-पाया पडून जनरल प्रसादनी मला समजावलं " बाबा तू काहीही करून इथून नीघ ! थोडा पुढे जा आणि मिळेल त्या धनगराच्या झोपडीत आजची रात्र काढ म्हणजे मी जनरल कौलना सांगायला मोकळा की, कोण ? ब्रिगेडियर दळवी ? इथं नाही आहे, तो पुढे गेला ! आता बोलत बसू नकोस, अहवाल राहू दे. हमाल मिळतील की नाही ते जाऊं दे. सगळं खड्डयात जाऊ दे. तू प्रथम घोलाकडे नीघ ! पुढचा हुकूम तुला नंतर कळवीन ! "

मी माझ्या कमांडिंग ऑफिसर्सना आणि स्टाफला बोलवून घेऊन त्यांना जनरल प्रसादनी मला जो काही हुकूम दिला होता तो कळवला आणि त्यांना हुकूम दिला की, ' चला ! तयारी करा आणि कशाही परिस्थितीत पुढे चला ! ' हे ऐकूनच त्यांच्या मनात शंका-कुशंकांचे वादळ माजले. पुढे काहीतरी अनिष्ट घडणार असल्याचे हे चिन्ह आहे हे भाकित त्यांनीसुद्धा केले. ' काहीही करा, पण पुढे जा ! ' हा जनरल प्रसाद यांचा हुकूम हेच सुचवीत होता की राजकीय संधिसाधूपणा ही इथून पुढच्या हालचालींची गुरुकिल्ली आहे.

हुकमाप्रमाणे ४ ऑक्टोबरला सकाळी ११–३० वाजता माझ्या ऑर्डर ग्रूप-

बरोबर घोलाकडे जाण्यासाठी मी लुंपू सोडले. काहीही कामगिरी अशी न देता, कोणतेही कारण न दाखवता मला दुसऱ्यांदा माझ्या हेडक्वार्टरमधून अपमानास्पद स्थितीत हुसकण्यात आले याबद्दल माझ्या मनाला रुखरुख लागली होती. लष्करी अधिकाऱ्याला अशा मानभंगापुढे दुसरे सगळे अपमान तुच्छ वाटतात. भारतीय लष्करातल्या कुठल्याही लष्करी अधिकाऱ्याचा असा अपमान भविष्यात कधी केला जाणार नाही अशी मी आशा बाळगतो. G. O. C. जनरल प्रसाद यांच्याशी झालेल्या बोलण्यामुळे मी मनाने पार खचून गेलो होतो. माझा अहवाल जर का असा फेकूनच द्यायचा होता तर तो लिहायला सांगितलाच का गेला ? काय उपयोग झाला माझ्या मेहनतीचा ? करायला गेलो एक अन् झाले भलतेच. आम्हांलाच हुकूम मिळाला की 'पुढे जा !' आता कमांडर काय करू शकत होता ?

लुंपूपासून अवघ्या दोन मैलांवर पुढे जाऊन आम्ही एका धनगराच्या झोपडीत तळ ठोकला.

५ ऑक्टोबर १९६२ हा दिवस थागला प्रकरणाच्या इतिहासातला आणीबाणीचा दिवस ठरला. त्या दिवशी जनरल कौलनी जनरल प्रसादना न विचारता मला कुठलीही सूचना नसताना माझ्या ब्रिगेडची हालचाल सुरू केली. आता बोलण्यात काही अर्थ राहिला नव्हता. जे जे होईल ते ते पाहावे ! दुसरं काय करणार ? वस्तुतः ही घटना मला नंतर कळली, पण ती इथे मी एवढ्याचसाठी सांगतोय. कारण या ब्रिगेडची हलवाहलव जनरल कौलनी ज्या पद्धतीने केली ती पद्धत हेच दाखवीत होती की, भराभर होत असणाऱ्या नाट्यपूर्ण लष्करी हालचाली आणि जनरल कौल यांची नेमणूक यांचा अन्योन्य संबंध आहे. आता हेच पाहा ना. चढाईच्या योजनेबाबत चर्चा करण्यासाठी जनरल कौल मला ७ ऑक्टोबरला धोला या ठिकाणी भेटणार होते. पण त्यांना असे काही वाटले नाही की, अशी चर्चा करण्यापूर्वी ५ ऑक्टोबर ते ७ ऑक्टोबर या दोन दिवसांत जरा दमाने घेऊन आघाडीवरच्या परिस्थितीचा अभ्यास करावा. तसे त्यांनी केले असते तर आमच्या चर्चेच्या वेळी त्यांच्या-माझ्यात एकवाक्यता निर्माण होऊ शकली असती. आघाडीची सूत्रे हाती घेतल्यानंतर जनरल कौलनी त्यांच्या अधिकाराची अंमलबजावणी सुरू केली आणि ती करीत असताना प्रस्थापित प्रघात पाळले नाहीत. आघाडीवरच्या परिस्थितीचा अभ्यास करण्याऐवजी हिटलरचा आव आणून भलत्याच ऐटीने लहान नाही–मोठा नाही – ते वरिष्ठ आणि कनिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांच्या डोक्यावर पाय देत सुटले. त्यांनी स्वतःच कबूल केलेला राजकीय हेतू साध्य करण्यासाठी आघाडीवरच्या लष्करी अधिकाऱ्यांची त्यांनी टवाळी सुरू केली. प्रत्येकाकडे अधिकारवाणीने पाहत डोळे गरागरा फिरवीत हुकूम देत सुटले, 'अजून तू मागे कसा ? चल पुढे नीघ !' पंडित नेहरूंनी इतके दिवस वर्षाव केलेल्या प्रेमामुळे आणि दिलेल्या उदार आश्रयामुळे त्यांची इभ्रत आणि प्रतिष्ठा भलतीच वाढली

होती. शिवाय दुसऱ्याची कुचेष्टा केल्याशिवाय स्वतःची प्रतिष्ठा कशी वाढणार? हे सूत्र त्यामागे होतेच. भारत-चीन युद्धाच्या अश्वमेध यज्ञासाठी प्रत्यक्ष राजाने सोडलेल्या या शामकर्ण अश्वाचा लगाम धरण्याची कुणाची हिंमत होत नव्हती. त्यांच्याविरुद्ध ब्र काढण्याची कुणाची छाती नव्हती. माझ्यासकट सर्व लष्करी अधिकाऱ्यांवर त्यांनी दहशत बसवली. आता कुठल्या वातावरणांत आम्ही कनिष्ठ लष्करी अधिकारी वावरत होतो, आमची मनःस्थिती कशी होती हे तुमच्या लक्षात आले असेल.

मी सुद्धा माझा हा गुन्हा कबुल करतो की, जनरल कौलनी माझ्या ब्रिगेडच्या हालचालीत ढवळाढवळ केल्याचे ऐकून देखील त्यांना विरोध करण्याचे धाडस मला झाले नाही.

५ ऑक्टोबरलाच जनरल कौलना अंदाज आला होता की जर का जलद गतीने आपण आपली स्थिती सुधारली नाही तर चिनी प्रचंड संख्येने लाटेसारखे आत घुसतील आणि अनर्थ ओढवेल. देश संकटात येईल. हेडक्वार्टर ईस्टर्न कमांडला त्यांनी कळवले होते की तावांगचा कबजा घेण्याच्या हेतूने चिनी सांगधर, धोला प्रदेशात आपल्याला कोंडीत पकडण्याची शक्यता आहे. भवितव्यता अशी भीषण असताना देखील कौल भलत्याच आत्मविश्वासाने सांगत होते की, " अडचणी काही -ही असल्या तरी हुकमाप्रमाणे चिन्यांना हुसकून देण्यासाठी मी जीवाचे रान करीन ! " असलं ओबडधोबड आश्वासन आघाडीला भेट देऊन तिथल्या परिस्थितीचा अभ्यास करण्यापूर्वीच जनरल कौलनी दिलं होतं. लष्करी अधिकाऱ्याला शोभेल असे त्यांचे वागणं आणि वृत्ती नव्हती. बाजूला उभे राहून त्यांना लढाई फक्त बघायची नव्हती. प्रत्यक्ष परिस्थिती त्यांना काबूत आणायची होती. त्यासाठी जी काही पावलं टाकायला हवी होती ती जर का चुकीची टाकली गेली तर त्यांची जबाबदारी त्यांना झटकून टाकून मोकळ होता येणार नव्हतं. कौल आघाडीवर येण्यापूर्वी कितीतरी अगोदरपासून आघाडीवर आलेले कमांडर्स आर्जवाने सांगत होते की, इथली परिस्थिती हाताबाहेर गेलेली आहे. आता घाई करून ती तावडतोब काबूत येणे शक्य नाही. जनरल कौल आले ! आघाडीवरून त्यांची नजर फिरली पण त्यांनी पाहिलं मात्र काही नाही. वाचन करणं आणि पुस्तकाची पान उलटत जाऊन वाचलं म्हणून सांगणे यात फरक आहे आणि तरीदेखील ५ ऑक्टोबरनंतर घडवून आणण्याच्या हालचालीची सूत्रे त्यांनी सोडली नाहीत. ५ऑक्टोबरला दुपारी जनरल कौल विमानाने लुंपूला रवाना झाले. आपण लुंपूला कां गेलो या बाबतीतलं त्याचे म्हणणं म्हणजे त्यांच्या कल्पक बुद्धिमत्तेची कमाल आहे ! जनरल-कौल म्हणतात की हवामान खराब असल्यामुळे त्या दिवशी ते सर्कीम (Serkhim) ला जाऊ शकले नाहीत. वस्तुस्थिती अशी होती की सर्कीम या ठिकाणी विमानतळच नव्हता. ५ ऑक्टोबरला रात्रीच्या रात्रीत माझ्या इंजिनियर्सनी तिथे छोटा विमान

तळ बांधून काढला होता ! मग ५ ऑक्टोबरला दुपारी कौल साहेब तिथे कसे उतरणार होते ? कौल पुढे म्हणतात " वेळेचा सदुपयोग व्हावा म्हणून मी लुंपूला गेलो " जनरल कौल यांच्या या ठरलेल्या कार्यक्रमाच्या बाहेर जाऊन दिल्या गेलेल्या अयोग्य आणि घावत्या भेटी मुळे थागला प्रकरणात आणखी एक अवांतर उप-कथानक निर्माण झालं,की, ज्याने पुढे अनर्थ घडवला. कारण जनरल कौलचं पुढे असं म्हणतात की " लुंपूला गेल्यानंतर ७ व्या पायदळ तुकडीला, २/ राजपूत आणि १।९ गुरखाज मधल्या हमालांची वाट पाहत बसलेल्या जवानांना मी हुकूम दिला की हमालांची वाट पाहात न बसता तुमचं सामान तुम्ही स्वतःच उचला आणि उद्याच्या उद्या धोलाकडे रवाना व्हा ! " जय स्वावलंबन ! या जवानांना आवश्यक असणारं इतर सामान शक्य तितक्या लवकर आणि जमेल तसं पुढे पाठवून देण्याची व्यवस्था मी करीन असं आश्वासन या जवानांना जनरल कौलनी दिलं होतं ! मला असे वाटलं की या नव्या साहेबाला सांगावे की, ' अरे बाबा ! जवान फक्त हमालांची वाट पाहत बसलेले नाहीत ! ते वाट पाहत आहेत हुकमाची ! ते वाट पाहत आहेत की सांगधर या ठिकाणी आवश्यक त्या दारूगोळ्याची व्यवस्था झालेली आहे की नाही ? या बातमीची ! "

जनरल कौल ज्यांना हुकूम सोडत होते त्यांचं या बाबतीतलं म्हणणं वेगळं होतं. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे लुंपू या ठिकाणी जनरल कौलांनी उड्डाण केलं त्या दिवशी म्हणजे ५ ऑक्टोबरला प्रकार घडला तो असा. जनरल कौलनी दुपारी २।। वाजता उड्डाण केलं. लुंपू येथे त्यांच्या स्वागतासाठी ( ! ) लेफ्टनंट—जनरल सेन ऑफीसर कमांडिंग द फिल्ड अँम्ब्युलन्स, मेजर जयरामन सर्जन, आणि मेजर खरबंडा, ब्रिगेड मेजर हे हजर होते. ४थ्या कोअरचा नवा कमांडर अशी आपली ओळख जनरल कौलनी स्वतःच करून दिली. हस्तांदोलन वगैरे विधी पार पडल्यानंतर जनरल कौलनी मेजर खरबंडांना विचारले की " 4th डिव्हजनचा GOC कुठाय ? " त्यावर मेजर खरबंडानी उत्तर दिले की " मला माहीत नाही, कारण कधी ते तावांगमध्ये असतात तर कधी तेझपूरला असतात ! " जनरल कौलनी नंतर विचारले की " ७ व्या पायदळ तुकडीच्या सर्व तुकड्या सांगधर पर्यंत जाऊन पोचल्या का ? " मेजर खरबंडांनी जबाब दिला कि " नाही साहेब ! अजून गेलेल्या नाहीत."

जनरल कौलनी रागाने विचारले की " का नाही गेल्या ? माझा असा स्पष्ट हुकूम होता की ७ ऑक्टोबरच्या संध्याकाळपर्यंत ७ वी पायदळ तुकडी सांगधर पर्यंत गेलीच पाहिजे ! " जनरल कौलनी पुढे मेजर खरबंडांना दम दिला की "माझा हुकूम मोडण्याचे धाडस तुम्हाला झालंच कसं ? तू फक्त ब्रिगेड मेजर आहेस ! पंतप्रधान पंडित नेहरूंना मी शब्द देऊन आलोय की मी ही मोहिम पार पाडीनच. समजलास कोण मला तू शिलाँगमध्ये बसून आघाडी संभाळणारा कोअर कमांडर मी नव्हे ! " ( समजलं यात काही तुम्हांला ? आघाडीवरून बदली करून शिलाँग

मध्ये पाठवल्या गेलेल्या जनरल उमरावना मारलेला हा टोमणा होता ! )

परिस्थितीचे ज्ञान नसताना जनरल कौल जाहीर रीत्या ७ व्या पायदळ तुकडीचा सुस्तपणा आणि लायकी या बाबतींत झोंबतील अशी टीका करीत होते.

जनरल कौलनी नंतर ब्रिगेड मेजर खरबंडा यांच्याकडून कारणें मागवली ती-सुद्धा अशासाठी की, " माझा हुकूम अमलात का आणला गेला नाही याची कारणं द्या ! " आणि मेजर खरबंडा काही बोलण्यापूर्वीच ते पुढे म्हणाले, " हे बघ ! हे काही माऊंट एव्हरेस्ट नाही आहे ! मी तुला आत्ता पुन: हुकूम देतो की सगळ्या लढाऊ तुकड्या तावडतोब पुढे पाठवून दे ! ...आणि हे काम जर का झाले नाही तर तुला मी डिसमिस करीन ! " मेजरला ही वागणूक ! ब्रिगेड मेजर खरबंडा यांनी कळकळीने सांगितले की " साहेब ! मला असा हुकूम मिळाला होता की दुसरा आणि पुढचा हुकूम मिळेपर्यंत आणि जनरल कौल यांची आणि ब्रिगेडियर जे. पी. दळवींचे बोलणे होईपर्यंत तुकड्या पुढे पाठवू नको ! " झालं ! आगीत तेल पडलं ! ब्रिगेडियर दळवींशी विचारविनिमय करून मग तुकड्या पुढे पाठवायच्या, what is nonsence ! जनरल कौल संतापले आणि मेजर खरबंडांना म्हणाले की " आता उगाच जास्त बडबड करून लंगड्या सबबी सांगू नकोस ! आज ब्रिगेड मेजर आहेस. उद्या सकाळी असशीलच असं नाही ! " (He again threatened to sack this capable officer if he made any more excuses. )

ब्रिगेड मेजर खरबंडा यांनी हमालांच्या तुटवड्याचा उल्लेख केला यावर जनरल कौलनी मूळ मुद्दा सोडून देऊन एकदम विचारले " हमाल नाहीत ? अरे तावांग-मध्ये पुष्कळ हमाल आहेत ! आणि त्यांना मी वेठीस धरतो की नाही ते बघ ! " कौलसाहेबांनी पुढे या शब्दांवर भर दिला की " मला फक्त जास्तीत जास्त संगिनी ( Bayonet–strength ) आघाडीवर कशा जातील ते पाहायचेय. वा: ! काय पण शब्द ! संगिनी ! पण त्या संगिनी वापरायला जवान लागतात, जवान प्रथम जिवंत ठेवावा लागतो. त्यासाठी त्याला अन्न-वस्त्र आणि इतर बरंच सामान पुरवावं लागतं आणि ते उचलायला हमाल लागतात ! हे कौलसाहेब तुम्हांला कुणी सांगायचं ? घोषणा करताना सोपं वाटते पण ती घोषणा अंमलात आणणं मात्र फार कठीण असतं. आपल्या दोन्ही बटालियन्सचे जवान आधीच थकले भागलेले होते. आणि जनरल कौलना अशी घाई झाली होती की या बटालियन्स काहीही करून जगात गाजलेल्या प्रचंड प्रबळ सेनेसमोर नेऊन उभ्या करायच्या ! त्यांची खाण्यापिण्याची सोय न करताच !

जवानांच्या खाण्या-पिण्याबाबत कुणी प्रश्न उपस्थित करायचीच खोटी ! लगेच त्याला शांत केलं जात असे की काळजी करू नकोस! सांगधर या ठिकाणी विमाना-तून रसद टाकली जाईल ! सरतेशेवटी निराशेने मेजर खरबंडा यांनी विनंती

करून सांगितलं की, " उद्या पहाटेच बाकीच्या तुकडया पुढे जातील. कारण आत्ता दुपारचे ३–३० वाजल्येत. तुकड्या फार फार तर एक तास चालत जाऊन पुढे जाऊ शकतील आणि नंतर वाटेतच थांबून त्यांना उघड्यावरच तळ देऊन रात्र काढावी लागेल. उद्या पहाटे जवान इथून निघाले तरी आजचा तथाकथित प्रवास ते उद्या भरून काढू शकतील.

माझ्या स्टाफने मला त्या वेळी घडलेल्या या संभाषणाची दिलेली माहिती हेच ओरडून सांगते की, वरवर पाहता सरळपणाने जनरल कौल यांनी ७ वी पायदळ तुकडी नामका-चूपर्यंत कशी हलवली गेली, याची दिलेली माहिती ही त्यांची पश्चात-बुद्धी आहे! फेब्रुवारी-मार्च १९६३ पर्यंत ७ व्या पायदळ तुकडीच्या गलबताने नाम-काचूमध्ये जाऊन कसा काय नांगर टाकला याबद्दल अनेक शंका-कुशंका उपस्थित होत होत्या. माझ्या ब्रिगेड मेजरला नेफा पराभव चौकशी मंडळाने (NEFA enquiry board) त्यांच्या सतत झालेल्या दोन बैठकीत बारीकसारीक प्रश्न विचारले. मला असं कळतं की, ही चौकशी आपल्या अंगाशी येईल, अशी खात्री असलेल्या काही लोकांची या चौकशीमुळे धांदल उडाली. त्यांना बरीच धावपळ करावी लागली! त्यांनी खटपट लटपट करून हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला की, या पराभवाची जबाबदारी आमच्यावर नाही. तर अमक्या तमक्यावर आहे! सरतेशेवटी मेजर खरबंडा यांनी जनरल कौल आणि ते यांच्यातल्या झालेल्या संवादाची शब्दश: माहिती–जशीच्या तशी–बोर्डासमोर ठेवली आणि ७ व्या पायदळ तुकडीला निर्दोष ठरवले!

मला माझ्या एका विश्वासार्ह मित्राकडून असं कळलं की, त्या वेळी अशी जाणून-बुजून समजूत करून दिली जात होती की, कमांडर ब्रिगेडियर जे. पी. दळवी फार शूर आहे! आणि त्यांनी निर्भयपणे " चिन्यांना हुसकून देण्याची कामगिरी स्वीकारलेली आहे!" हा प्रकार म्हणजे स्वत:ची कातडी बचावण्यासाठी धुसडून दिला गेलेला खोटा पुरावा होता. तो करणाऱ्या लोकांची अशी कल्पना होती की, लढाईत ब्रिगेडीयर जे. पी. दळवी मेला! दळवी मेला! हे समजणाऱ्या महाभागांची अशी कल्पना होती की, कमांडर जे. पी. दळवीला उद्देशून आता आपण " शूर-वीर-असा मनुष्य झाला नाही! आणि होणार नाही. " वगैरे वगैरे बोलू! सत्य सांगायला तो काही आता परत येत नाही नक्की! काही करून आपली जबाबदारी ब्रिगेडियर जे. पी. दळवींच्या बोडक्यावर मारली की आपण सुटलो. पण कसचं काय नि कसचं काय! १६ नोव्हेंबर १९६२ ला खुद्द चिन्यांनीच जाहीर केलं की, कमांडर जे. पी. दळवी आमच्या कैदेत आहे! ...आणि माझ्या मृत्यूबाबत उठवली गेलेली अफवाच अल्पजीवी ठरली! (क्रमश:)

From Himalayan Blunder by Brig. J. P. Dalvi
Thacker & Co. © with the Original Publisher

# आधुनिक विज्ञानेश्वरी

दत्तप्रसाद दाभोळकर

## सपनों के सौदागर

स्वप्नांच्या मागे धावणारी जगावेगळी माणसे पाहताना आपण क्षणभर हरवून जातो. कोणतेतरी मुलखावेगळे खूळ डोक्यात घेऊन आपल्याच तंद्रीत हे लोक हिंडत असतात. विज्ञानक्षेत्रातही हे असले झपाटलेले वेडेपीर भेटतात. जगात काल-पर्यंत काय घडलंय हे या लोकांनी वाचलेले असते. अभ्यासलेले असते. पण या ज्ञानाचा अपुरेपणा त्यांना अस्वस्थ करीत असतो. कालचं ज्ञान हे आजचं अज्ञान आहे असे या लोकांना वाटते. हे अज्ञान चालू काळाचा रस्ता रोखून उभे आहे असे यांचे ठाम मत असते ! आणि मग हे लोक एखादा नवा रस्ता शोधावयाला कोलंबसासारखे बाहेर पडतात. इतरांना हास्यास्पद विक्षिप्त वाटतील असे काही नवे प्रयोग हे लोक करीत बसतात.

चालू काळातील या अशा झपाटलेल्या संशोधकांचा मुकुटमणी डॉ. लेव पॉलझेव. हा रशियातला एक नाणावलेला शास्त्रज्ञ आहे. 'सायन्स' मासिकात त्याने नुकतेच स्वतःचे प्रयोग प्रसिद्ध केलेत. काही नव्या कल्पनांवर हे प्रयोग आधारलेले आहेत. पालीची शेपटी तुटली तर ती परत येते हे आपणांला माहीत आहे. कात टाकणाऱ्या प्राण्यांच्या अंगावर नवी कातडी येते. माणसानेही नखे कापली की नवी नखे येतात. कोणत्याही सेंद्रिय पदार्थाच्या संपृक्त द्रावणात त्या पदार्थाचे स्फटिक टाकले तर त्या द्रावणाचे सुंदर शुद्ध स्फटिकात रूपांतर होते. पॉलझेव म्हणतो, " हे जर सारे खरे आहे तर आणखीही एक गोष्ट शक्य आहे. माणसाचा एखादा अवयव तुटला, निरुपयोगी झाला तर तो पुन्हा आपोआप निर्माण झाला पाहिजे–" म्हणजे पॉलझेवच्या मते हृदय बदलण्याच्या शस्त्रक्रिया याच मुळी मध्ययुगीन कल्पनेतून जन्मलेल्या आहेत ! त्यापेक्षा हृदयविकाराने आजारी अस-लेल्या माणसाच्या शरिराने नवे हृदयच निर्माण केले पाहिजे ! किमानपक्षी त्या आजारी हृदयातील कमकुवत रक्तवाहिन्यांऐवजी नव्या निरोगी रक्तवाहिन्या त्या हृदयाला फुटल्या पाहिजेत. गेली वीस वर्षे पॉलझेव या एका कल्पनेवर वेगवेगळे प्रयोग करतोय. तुटलेले दात आणि मोडलेली हाडे या प्रकारांनी बरी करण्यात

मर्यादित स्वरूपाचे यश पॉलझेवने मिळवले आहे. एका माणसाच्या हाताचे हाड तुटले होते. पॉलझेवने दुसऱ्या एका मृत माणसाच्या हाडाचा चुरा घेतला. तो चुरा हाड तुटलेल्या रोग्याच्या रक्तात खूप वेळ भिजवला. आता त्या हाडाचा लेप तुटलेल्या हाडावर योग्य ठिकाणी योग्य प्रमाणात दिला तर तुटलेले हाड बरे होईपर्यंत वाढत राहते असे पॉलझेवचे म्हणणे आहे. पॉलझेव म्हणतो, "मोडलेल्या हाडाचे काय घेऊन बसलाय, पुढे मागे माणसाला सबंध पाय किंवा हात फुटू शकेल !"

असाच दुसरा एक संशोधक आहे. त्याचे नाव डॉ. जॅक हडसन. हडसन हा कॉरनेल विद्यापीठात प्राणिशास्त्राचा प्राध्यापक आहे. हिमप्रदेशातील अस्वले कडक थंडीच्या दिवसांत सहा सहा महिने झोपी जातात. हे झोपणे (hibernation) नेहमीच्या झोपण्यापेक्षा फार वेगळचा स्वरूपाचे असते. खरे बोलावयाचे तर, ही अस्वले सहा महिने समाधी लावून बसलेली असतात ! त्या वेळी त्यांना अन्न, पाणी काही लागत नाही. फार थोडचा प्राणवायूच्या पुरवठ्यावर त्यांचे शरीर फक्त चालू असते. या समाधी लावण्याच्या पद्धतीमुळे हे प्राणी स्वतःचे आयुष्य दुपटीहून अधिक वाढवतात. कडक थंडी, प्रचंड उकाडा, हिमवादळे असल्या अफलातून न पेलणाऱ्या हवामानात सहज जिवंत राहू शकतात. हडसनने अशा अनेक समाधी लावणाऱ्या प्राण्यांचा अभ्यास केला आहे. त्याच्या मते किमान दोनशे प्राण्यांना ही कला अवगत आहे. हडसन पुढे म्हणतो, "माणसाने पण हे समाधी लावण्याचे जुने तंत्र पुन्हा अवगत केले पाहिजे. मानसिक शक्ती वा बाह्य उपायांनी माणसाची हुकमी समाधी लावता आली तर मानसिक जीवन खूप सुसह्य होईल. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे दूरच्या ग्रहावर जाण्यापूर्वी अंतराळप्रवाश्यांची समाधी लावली तर सारे प्रश्न सुटतील. अंतराळप्रवास कोणालाही पेलतील. अंतराळप्रवासाच्या मागे लागलेल्या रशियन व अमेरिकन शास्त्रज्ञांनी हडसनच्या प्रयोगाला तूर्तास फार मोठी आर्थिक मदत देऊ केली आहे.

असाच हा तिसरा स्वप्नवेडा पाहा. याचे नाव डॉ. गिफॉर्ड बी. पिचकॉट. जगातला दुष्काळ कायमचा हटवण्यासाठी त्यांच्याजवळ एक अक्सीर इलाज आहे. प्रो. पिचकॉट म्हणतात, "जगण्यासाठी सर्व सजीवांना उपलब्ध खनिज पदार्थांचे सेंद्रिय पदार्थात रूपांतर करून हवे असते. सूर्यापासून मिळणाऱ्या शक्तीचा उपयोग करून (photosynthesis) वनपस्तिसृष्टी हेच काम करते. वनस्पती सोडून इतर सजीव प्राणी सूर्यशक्तीचा असा वापर (photosynthesis) करू शकत नाहीत. म्हणूनच आपण आपल्या अन्नासाठी वनस्पतींवर वा इतर सजीवांवर अवलंबून असतो. आता पृथ्वीचा तीन-चतुर्थांश भाग पाण्याने व्यापलेला आहे. म्हणजे जमिनीपेक्षा तिप्पट अधिक सूर्यशक्ती पाण्याला मिळते. त्यामुळे समुद्रात जर आपण अन्न पिकवू शकलो तर जगातील लोकसंख्या वाटेल तेवढी वाढली तरी जगात दुष्काळ


पडणार नाही." समुद्रापासून अन्न काढण्याची त्याची कल्पना पण वेगळी आहे. जगातील सर्वांत मोठा प्राणी म्हणजे व्हेल मासा. प्रो. पिंचकॉट म्हणतात, "समुद्रात आपण व्हेल माशांची मोठ्या प्रमाणावर शेती केली पाहिजे. काही समुद्र तर राखीव कुरणासारखे फक्त व्हेल माशांसाठीच राखून ठेवले पाहिजेत. व्हेलपासून मिळणारे मांस, स्निग्ध पदार्थ आणि जीवनसत्त्वे एवढी अमर्याद आहेत की, जगभरचे लोक या अन्नावर सुखासमाधानात राहू शकतील. लोकांना रुचिपालट म्हणून शेवाळ्यापासून बनवलेली रुचकर बिस्किटे पण अधीमधी द्यावीत!" व्हेल माशांचे कळप कोणत्या समुद्रात पाळावयाचे, समुद्राला विजेच्या तारांची कुंपणे कशी घालावयाची, व्हेलचे तांडे हाकारण्यासाठी गुराखी कसे नेमावयाचे, असले सारे प्रश्न विचारात घेऊन प्रो. पिंचकॉट यांनी आपली योजना बनवलेली आहे. जागतिक स्वरूपाचा भीषण दुष्काळ ज्या वेळी पडेल, त्या वेळी आपली योजना विनाविलंब स्वीकारावी लागेल, असा पिंचकॉट यांचा विश्वास आहे!

—डॉ. पॉलझेव, प्रो. हडसन, डॉ. पिंचकॉट हे अखेर स्वप्नवेडे लोक आहेत. हे लोक बरोबर आहेत की चूक आहेत हा मुद्दा अर्थातच गौण आहे. हे लोक कदाचित पूर्णपणे चुकीचेही असतील, ...पण अखेर या असल्या स्वप्नवेड्या प्रयोगवीरांचे अपयशही तुमच्यामाझ्या यशापेक्षा अधिक विलोभनीय असते.

## डॉक्टरांवर संक्रांत....?

आपल्या अणुशक्ति केंद्राचा 'संगणक विभाग' (Computer Section) हा एक अत्यंत कार्यक्षम विभाग आहे. चार महिन्यांपूर्वी, त्यांनी बनविलेल्या एका संगणकाची माहिती विज्ञानेश्वरीने प्रसिद्ध केली होती. आता असाच एक वेगळा संगणक त्यांनी बनविला आहे. नुकताच एका अनौपचारिक समारंभाने तो मुंबईच्या 'के. ई. एम.' रुग्णालयात बसविण्यात आला. या रुग्णालयात मेंदूची विद्युतशक्ती मोजणारे विद्युत यंत्र [electroencephalogram] आहे. पण या यंत्रावर मेंदूची एकत्रित विद्युत शक्ती मापली जाते. हा नवा संगणक जर या यंत्राला जोडला तर मेंदूच्या वेगवेगळ्या विभागाची दर क्षणाला बदलणारी विद्युतशक्ती कळू शकेल. माणसाचा मेंदू म्हणजेसुद्धा अखेर अब्जावधी पेशींपासून बनवलेले एक विद्युत यंत्रच आहे. त्यामुळे या मेंदूची जर प्रतिक्षणी बदलणारी विद्युतशक्ती मापता आली, तर काही रोगांचे निदान करणे, मोहिनी औषधांचा [Tranqulisers] मानवी मनावर होणारा नक्की आघात शोधणे खूप सोपे होईल.

या समारंभाच्या निमित्ताने संगणक केंद्राचे अधिकारी डॉ. पी. व्ही. एस राव यांनी या यांत्रिक मेंदूच्या करामतीच्या अनेक गोष्टी सांगितल्या. त्यांच्या मते आणखी काही वर्षांनी रोगाचे निदान करणे, औषध ठरवणे, असल्या अनेक गोष्टी हे यांत्रिक मेंदू



**के. ई. एम्. रुग्णालयात नव्या संगणकाची चाचणी चालू असताना**

करू शकतील. म्हणजे आज आयुर्विमा महामंडळाच्या नोकरांवर जी आफत या संगणकांनी आणली आहे ती डॉक्टरांवर येणार ! पण डॉ. राव यांच्या मते डॉक्टरांनी काही घाबरण्याचे कारण नाही. कारण आजारीपणात डॉक्टरांनी दिलेला दिलासा अधिक महत्त्वाचा असतो आणि ते काम काही यांत्रिक मेंदू करू शकणार नाहीत. पण हे मेंदू डॉक्टरांना सहाय्यक म्हणून खूप उपयोगी पडतील. रुग्णालयातील ग़लथानपणा तर या यांत्रिक मेंदुमुळे खूप कमी होऊ शकेल. ठरल्या वेळी रोग्याचा ताप नोंदवणे, रोग्याचा ताप अपेक्षेपेक्षा अधिक वाढला तर डॉक्टरांना फोन करून कळवणे, रोग्याला औषध देण्याच्या वेळी नर्सला जागे करणे ! डॉक्टरांनी केलेले निदान चूकीचे वाटले तर आपला मतभेद नोंदवणे, अशा अनेक गोष्टी पुढील दशकात हे संगणक करणार आहेत. ■■

[ पृष्ठ ६ वरून ]

दृष्टीने जे प्रचार मोर्चे बांधले होते, तो डाव मात्र पूर्णतया उधळला गेला. इटाली ऑस्ट्रेलिया, फ्रान्स आदी ठिकाणच्या कम्युनिस्ट पक्षांनी ह्या ठरावाला सक्त विरोध दर्शविला. रशियनांचा दुसरा पराभव झाला तो झेक-आक्रमणासंबंधात चर्चा घडू न देण्याबाबत त्यांनी व त्यांच्या छत्राखालील सध्याच्या झेक-प्रतिनिधींनी केलेले प्रयत्न फसले तेव्हा. कम्युनिस्ट चळवळीच्या सुरवातीपासून, ह्या सर्व चळवळींची सूत्रे मॉस्कोहूनच हालत. चीनमुळे मॉस्कोच्या वर्चस्वाला धोका निर्माण झाला. तेव्हा पेकिंगला वाळीत टाकून मॉस्कोकडेच कम्युनिस्ट जगाचं नेतृत्व कायम राखायचा रशियनांचा प्रयत्नही असाच फसला आहे. ह्या परिषदेत शेवटी त्यांना मान्य करावच लागलं की, चळवळींचा पसारा वाढलेला असल्यामुळे केंद्रीकरण अशक्य झालं आहे. प्रत्येक देशातल्या कम्युनिस्ट पक्षाला जागतिक कम्युनिस्ट चळवळींची हानी होऊ न देता स्वतंत्रपणे धोरण आखण्याची मुभाही तोंडदेखली का होईना देणं, रशियाला भाग पडलेलं आहे. ह्या परिषदेचा आणखी एक विशेष म्हणजे विविध प्रतिनिधींना वादविवाद करायला पूर्ण मोकळीकही मिळाली व उलट सुलट सर्वच प्रतिक्रियांना भरपूर प्रसिद्धिही मिळाली. जागतिक कम्युनिस्ट पक्षांच्या आजपर्यंतच्या पोलादी पडद्यामागील बैठकींचा इतिहास पाहता, मॉस्को परिषदेच्या वेळचा हा बदल जागतिक कम्युनिस्ट चळवळीतल्या नव्या हालचालींचीच दिशा दाखवून जातो.

एक काळ असा होता की कम्युनिस्ट जगतात रशिया म्हणेल ती पूर्व दिशा असा प्रकार होता. परंतु आज परिस्थिती भिन्न आहे. रशिया, चीन, युगोस्लाव्हिया, क्युबा ही निदान चार राष्ट्रे तरी आज अशी आहेत की, कुणाच्याही वर्चस्वाखाली न राहता कम्युनिस्ट पद्धतीने इथला राज्यशकट चालू आहे. स्वराष्ट्रहिताला जास्तीत जास्त प्राधान्य देऊन त्यांनी स्वतःची धोरणे स्वतंत्रपणे आखली आहेत, राबवली आहेत; नव्हे स्वराष्ट्रांची उत्तम प्रगतीही साधली आहे. अर्थातच अशा परिस्थितीत, रशिया काय किंवा चीन काय, कुठल्याही एका राष्ट्राला निर्विवाद नेतृत्व करणं आज तरी अशक्य आहे. मॉस्कोत जे मतभेद गाजले, चव्हाट्यावर आले, त्यांनी हीच गोष्ट सिद्ध झाली आहे. कम्युनिस्ट तत्त्वज्ञान मान्य असलं तरी त्याला प्रखर राष्ट्रवादाची जोड असली तरच राष्ट्रोन्नति होईल हे हो चि मिन्ह हा जाणतो, व शक्यतो दोन्ही कम्युनिस्टांशी मैत्री ठेवायचा प्रयत्न करतो आणि वेळ पडल्यास दोघांनाही न रुचणारं पण राष्ट्राच्या दृष्टीनं आवश्यक धोरण स्वीकारतो. चीन, युगोस्लाव्हिया, क्यूबा, झेकोस्लावाकिया ह्याच मार्गांनी गेले आहेत! कम्युनिस्ट चळवळीतला हा बदल स्वागतार्हच आहे.

■■

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



श्री. गो. जोशी, सायनाचार्य

५ जुलै ते ११ जुलै, १९६९

**मेष** : कित्येक महिन्यांची वक्री मंगळांची डोकेदुखी या आठवडयात थांबणार आहे. दि. ८ जुलैशिवाय पराक्रम स्थानी रवि-बुधाची उपस्थिती – हे सर्व अधिक महिन्यात घडत असल्यामुळे, अधिकस्य अधिक फलं असा प्रत्यय आपणास पदोपदी येऊ लागेल.

ज्या ज्या क्षेत्राशी आपला संबंध असेल त्या त्या क्षेत्रातील प्रगती आता वेग घेऊ लागेल. शुक्राचेही हार्दिक सहकार्य लाभणार आहे. यामुळे आपल्या साऱ्या सांपत्तिक समस्या सुटायला लागतील. दि. ७ जुलच्या शुक्र–हर्शल त्रिकोणापासून आपल्या कर्तृत्वाला उधाण यायला लागेल. नव्या आशा अंकुरायला लागतील. नोकरी धंद्यामध्ये अनपेक्षितपणे मोठे धनलाभ घडू लागतील. दि. ७ ते १० या कालाची नोंद करा.

**वृषभ** : दि. ८ जुलैला मंगळ मार्गी होताच तुमचे सारे रोखलेले रस्ते अनिर्बंध दिसू लागतील. मंगळाचा हृदयपालट झाल्यासारखे जाणवेल – आता त्याची बाधा सहसा होऊ शकणार नाही.

या आठवडयातील सर्वात महत्त्वाचा योग म्हणजे शुक्र–हर्शल त्रिकोण. या सर्वोत्तम योगाचा अधिकाधिक लाभ आपणांसच उठविता येईल.

कला–साहित्याच्या क्षेत्रांत नाव घेण्यासारखे कार्य आपल्या हातून घडेल. दीर्घ मुदतीचे आकर्षक करारमदार होतील. कौटुंबिक व व्यावहारिक संघर्ष मिटतील, थोरांचे सहकार्य लाभणार असल्यामुळे कोणत्याही नव्या धंद्यात पदार्पण करणे सहज शक्य होईल. बाराव्या शनीची दखल घेण्याची फारशी गरज भासणार नाही.

दि. ७ ते ९ या काळी नव्या आशा अंकुरायला लागतील.

**मिथुन** : या आठवडयातील बदलत्या ग्रहस्थितीचा आपल्या आचारा–विचारांवर, आरोग्यावरही चांगला परिणाम जाणवायला लागेल. सांपत्तिक लाभ अपेक्षेप्रमाणे

झाला नाही तरी आता आपले सहसा कुठेच नडणार नाही. उद्योगधंद्याचे बदललेले तंत्र यशस्वी ठरल्याचा प्रत्यय यायला लागेल.

नोकरीधंद्यातील बरेचसे पेचप्रसंग सुटू लागल्याची लक्षणे दिसू लागतील. या आठवड्यातील शुक्र–हर्शलचा त्रिकोण आपणांस काही कार्यांत अनपेक्षित यशाचा जाणवेल.

नवे स्नेहसंबंध जुळून यायला लागतील, प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात यायला लागतील. आता सहसा कोणत्याही कामात माघार घ्यायचा प्रसंग येणार नाही.

दि. ८ ते १० हे दिवस अपेक्षित यश पदरी टाकून जातील.

**कर्क :** मंगळ मार्गी झाल्याने, हरवलेले मानसिक स्वास्थ्य गवसेल पण सांपत्तिक बाजू थोडी फार घसल्यासारखी जाणवेल. व्यवस्थानातील रवि–बुधामुळे व्यावसायिक लाभ हुकतो की काय अशी भीती वाटू लागेल.

पण शुक्र–हर्शल त्रिकोण सर्व अनिष्ट योगांची भरपाई करू शकेल. ध्यानीमनी नसलेल्या अनेक चांगल्या गोष्टी या आठवड्यात घडून याव्यात.

विरोधक आता सहसा तुमच्या बाजूला फिरकणार नाहीत. कला-साहित्य क्षेत्रांतील तुमच्या मुक्त संचारामुळे अनेकांच्या मस्तकांत शूळ उठेल. सामाजिक, राजकीय क्षेत्रांत मात्र फारसा भाग घेऊ नका. दूरचा प्रवासही टाळा.

दि. ७–९–१० या कालाचे महत्त्व विशेषत्वाने जाणवेल.

**सिंह :** रवि–बुध लाभस्थानातून संचारत असताना मंगळही मार्गी होत आहे, हा मणिकांचन योगच. या वेळच्या शुक्र-हर्शल त्रिकोणानेही तुमच्या सांपत्तिक स्थितीत बरीच चांगली सुधारणा घडून येऊ शकेल. गेल्या कित्येक महिन्यांत इतका चांगला काल आला नसेल. धनस्थानच्या गुरूचे सामर्थ्य येथूनच तुमच्या प्रत्ययास यायला लागेल.

नोकरीधंद्यात एकाएकी आपली पावले पुढे पडायला लागतील. नवा यांत्रिक धंदा उभारण्यात यशस्वी व्हाल.

स्थावराचा प्रश्न सुटेल, राजकीय विवंचना मिटू लागतील. नव्या स्थावरखरेदीचे विचारही डोक्यात घोळू लागतील.

दि. ८ ते १० हे सारे दिवस खूपच धाईगर्दीचे जाणवतील.

**कन्या :** कित्येक दिवसांपासून तुमच्या राशीत हर्शलचे वास्तव्य आहे. या वेळी भाग्यस्थ शुक्र त्याच्याशी त्रिकोण करताच त्या हर्शलचे अनन्यसाधारण सामर्थ्य आपल्या प्रत्ययास यायला लागेल.

अनपेक्षित लाभ घडेल, कलेच्या क्षेत्रात एकाएकी महत्त्वाचे स्थान लाभेल, उद्योगधंद्याला एकदम उत्थान लाभेल. ध्यानीमनी नसता अनंत प्रगत घटना घडून येतील. नवे विचार, नव्या कल्पना घेऊन वाटचाल करू लागाल.

यांत्रिक उद्योगात नवे काही करून दाखवण्याची हिंमत बाळगून पुढे जाल तर आजवर कुणाला कधी न मिळालेले यश मिळवून दाखवाल.

तुमच्या जीवनातील हा एक उत्क्रांतीचा काळ निर्माण होत आहे. या वेळी लाभणाऱ्या संधीचा लाभ पदरी पाडून घेण्याचा शिकस्तीचा प्रयत्न केलात. तर तुमचे स्थान निश्चितच उंचावेल. याच वेळी सामाजिक प्रतिष्ठाही खूप उंचावेल.

दि. ७, ९, १० या काळाची नोंद ठेवा.

**तूळ** : आता आठव्या मंगळाची फारशी भीती बाळगण्याचे कारण नाही. मार्गी झालेला मंगळ निरुपद्रवी असतो म्हणतात, तुम्हालाही तसाच प्रत्यय यावा.

भाग्यस्थ सूर्य–बुध हेच तुमचे सूत्रधार आहेत. ते जबाबदारी वाढवतील, स्थानांतर घडवून आणतील आणि त्या नव्या वातावरणात तुमचे महत्त्वही वाढवतील. खर्चाचे मान बेसुमार वाढू लागेल. वाढत्या खर्चाला आळा घालायचा शिकस्तीचा प्रयत्न केलात तर भविष्यकालात फारसा ताण पडणार नाही.

कलावंतांना, साहित्यिकांना आणि संशोधकांना हा महिना गेल्या २–४ महिन्यांच्या मानाने बराच अनुकूल व स्वास्थ्याचा जाणवेल. नवे स्नेहसंबंध जुळून येतील. अपेक्षित यश पदरी पडेल.

दि. ८ ते १० अनेक कामे हातावेगळी होतील.

**वृश्चिक** : लाभस्थानी गरु-हर्शल अनेक दिवसांपासून आहेत; पण आताच त्यांच्या सामर्थ्याचा आपणास साक्षात्कार घडू लागेल. ७ जुलैच्या शुक्र-हर्शल त्रिकोणापासून आपल्या अनेक योजना आकार घेऊ लागतील आणि याच काळी मंगळही मार्गी होत आहे. तो तुमच्या बऱ्याचशा व्यथा–विवंचना मिटवून टाकील.

ग्रहांनी अनुकूल कौल दिला आहे. थोडा जरी प्रयत्न केलात तरी अमाप यश पदरी पडू शकेल.

शेती, रासायनिक द्रव्ये, परराष्ट्रीय व्यवहार या बाबतींतील तुमच्या अपेक्षा बऱ्याच प्रमाणात सफल व्हाव्यात.

दैविक कृपेचाही पदोपदी प्रत्यय यायला लागेल.

वैचारिक संघर्ष मिटेल मन प्रसन्न बनेल.

दि. ६ ते ९ या काळीं अनेक लाभ पदरी पडावेत.

**धनू** : अजुनीही काही काल मंगळ व्ययस्थानी आहे–पण मार्गी झाल्याने त्याच्यातील हवा निघून गेलेली आहे. आता त्याची दखल घ्यायची फारशी गरज भासणार नाही.

या वेळचा शुक्र-हर्शल-त्रिकोण तुमच्या बाबतीत काही भरीव व विधायक असे कार्य करू शकेल. परिस्थिती आता हाताबाहेर जाणार नाही याची खात्री वाटू लागेल.

सांपत्तिक ताण निश्चित कमी होईल, अनारोग्याची विवंचना बऱ्याच प्रमाणांत

मिटेल, हितशत्रूंची कारस्थाने त्यांच्याच अंगावर उलटतील. नोकरीधंद्यांतील प्रयत्नांना आता अपेक्षेप्रमाणे यश मिळू लागेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रांत मात्र फारसा भाग घेऊ नका.

दि. ८ ते ११ च्या कालात काही अनुकूल गोष्टी घडाव्यात.

**मकर** : तुमच्या लाभस्थानांतील मंगळ आता मार्गी होत आहे–झाल्यासारखाच आहे. त्याच्या सामर्थ्याबद्दल आजवर आपण साशंक होता. आता ती जागा आदराने भरून निघेल.

शिवाय भाग्यस्थ हर्शलशी पंचमस्थ शुक्राचा अंशपूर्ण त्रिकोण; इतका सर्वांगाने चांगला योग या वर्षातील हाच पहिला आणि अखेरचाही.

आजवरच्या आपल्या बऱ्याचशा असफल आशाआकांक्षा येथूनच सफल व्हायची लक्षणे दिसू लागतील. संपत्ति–प्रतिष्ठा–घवघवीत यश यांपैकी काहीही कदाचित सारेही आपल्या पदरी पडू शकेल. प्रयत्नांची मात्र शिकस्त करायला हवी.

दि. ९ ते २१ जुलै या कालावर सारे लक्ष केंद्रित करा.

**कुंभ** : पंचमस्थानातील रवि–बुधानी तुमच्या जीवनात आचारविचारांत सांसारिक जीवनातही क्रांती घडवून आणली. १४–१५ जून पासूनच तुमच्या जीवनाला वेगळे वळण मिळाले असेल. त्यांत आणखीन भर घालणारी ग्रहरचना या आठवड्यात निर्माण होत आहे. मंगळाची मार्गी अवस्था आणि शुक्र–हर्शल–त्रिकोण. या दोन्ही अवस्था तुमच्या जीवनात प्रसन्नतेची फुलबाग फुलवतील, भंगलेल्या आशाआकांक्षा सांधल्या जाव्यात म्हणून शिकस्तीचा प्रयत्न करतील.

कला, साहित्य, संशोधन या क्षेत्रांत काही नेत्रदीपक कार्य करण्याची संधी लाभेल. नव्या क्षेत्रांत नव्या वातावरणात तुम्हांला काही भरीव कार्य करून दाखविण्याची संधी लाभेल.

दि. ८ ते १० या काळी अपेक्षेप्रमाणे अनेक चांगल्या घटना घडाव्यात.

**मीन** : भाग्य स्थानातील मंगळ मार्गी झाल्याने तुमच्या अनुकूलतेत आणखीन भर पडेल. साडेसातीबद्दल आता मुळीच विचार करावा लागणार नाही. उद्वेग नैराश्य, असाह्यता हे शब्द आता विसरू शकता. ७।८ जुलैपासूनच आपले कालचक्र अनुकूल फिरू लागल्याचे आपणांस दिसायला लागेल. अनेक धनिकांचे सहकार्य लाभेल-कला-साहित्य क्षेत्रांतील व्यक्तींना या काळातील शुक्र–हर्शल अपेक्षेप्रमाणे सारे काही देऊन जातील. सांसारिक वातावरण प्रसन्न बनू लागेल.

दि. ७।८।१० अनेक अपेक्षा या काळी सफल व्हाव्यात.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी संगम प्रेस. प्रा. लि., १७ ब, कोथरूड, पुणे ४ येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649




" ...तर त्यावर मी म्हणालो, 'तुम्ही तरुण डॉक्टरनी हे लक्षात घेतलं पाहिजे की, दुसऱ्याच्या सेवेमुळं मिळणारा आनंद खरोखर अवर्णनीय आहे; सेवावृत्तीची वाढ होऊ देणं अन् अधिकाधिक गरजूंना या वृत्तीचा लाभ घेऊ देणं आपलं कर्तव्य समजलं पाहिजे...' "